# पंचवार्षिक योजनेचीं गाणीं

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

REFBK-0010039
REFBK-0010039

सत्यमेव जयते

मुंबई सरकारच्या प्रसिध्दी खात्याकडून प्रकाशित

# पंचवार्षिक योजनेचीं गाणीं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
REFBK-0010039
REFBK-0010039
वा. क्र. 10039

मुंबई सरकारच्या प्रसिद्धि खात्याकडून प्रकाशित

# प्रस्तावना

भगीरथ प्रयत्नांनी राष्ट्राची उन्नति करण्याचें जें महान् कार्य सरकारनें हातीं घेतलें आहे, त्यामागें प्रत्येक भारतीयाचें जीवन समृद्ध आणि शांततामय बनावें व त्याचें ऐहिक आणि नैतिक जीवनमान उच्च व्हावें हाच हेतू आहे.

आपण सुरू केलेल्या विविध योजनाहि याचकरितां आहेत, हें जनतेला समजणें आवश्यक आहे. "विनोद जननं तु नाट्यम्" असें म्हणतात. तेव्हां आपल्याला जी गोष्ट लोकांना सांगायची, ती विनोदाच्या सहाय्यानें समजवून सांगितली तर त्याचा अधिक परिणाम होईल.

म्हणून विविध विकास कार्यांचें दर्शन घडविणारीं नाटकें, काव्य, वगैरे साहित्य प्रसिद्ध करून ते अत्यंत कमी किंमतींत लोकांना व मनोरंजनाचें कार्य करणाऱ्या संस्थांना पुरविण्याच्या, प्रसिद्धि खात्याच्या योजनेनुसार ही 'पंचवार्षिक योजनेचीं गाणीं' प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

म. ही. शाह

प्रकाशन संचालक ( मुंबई सरकार )

अनुक्रम ........ दि. ........
क्रमांक ........ नों: दि: ........

# अनुक्रमणिका

| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| पहिली पंचवार्षिक योजना ( भाग १ ला ) | ५ |
| ,, ,, ,, ( भाग २ रा ) | ९ |
| ' कामधेनु दुजा साक्षात् ' | १३ |
| सुंदर अमुचा गांव | १७ |
| समाज जोवन शिक्षण | १९ |
| सत्य कहाणी | २१ |
| आदर्श खेडें | २२ |
| वैभव दडलें निज कष्टांतच ! | २४ |
| दुसरी पंचवार्षिक योजना | २५ |
| आतां नवा विचार ! | २७ |
| भुकेला कोंडा | २९ |
| जपानी भातशेती | ३० |
| " गांवकींत आपल्या ठरल्यालं हाय " | ३१ |
| महारीण | ३२ |
| कशि बनली मदिरा ! | ३४ |
| " अजुनि जायचे पुढे–" | ३४ |
| आमचें आदर्श खेडें | ३७ |
| छत्रपतींना मुजरा | ३८ |

| विषय | | | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| समाज विकास | .... | .... | .... | .... | ४० |
| हाकरे जोडी | .... | .... | .... | .... | ४१ |
| ज्ञानमंदीरी चला | .... | .... | .... | .... | ४२ |
| दारुबंदी योजनेसाठीं— | | .... | ... | .... | ४३ |
| ' पंचवार्षिका ' धरूं या हातीं | | ... | .... | .... | ४५ |
| निरक्षर प्रौढांसाठीं... | | .... | ... | .... | ४६ |
| डफावर थाप— | .... | .... | ... | ... | ४८ |
| दारूचा पोवाडा | .... | .... | .... | .... | ४९ |
| ग्रामराज्याचा पोवाडा | ... | .... | .... | .... | ५८ |

९००३८
...ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ...
अनुक्रम २३८८३ दि: १०८५
क्रमांक ... नों: दि: ...

# पहिली पंचवार्षिक योजना

## पोवाडा ( भाग १ ला )

चाल १ ली : पंचवार्षिक योजना आंखण्याचें, कारण हें साचें, घडलें एकदाचें, महाग झाली जनता अन्नवस्त्रास। दारिद्र्यानें पिडलें आपल्या भारतास। म्हणून ही योजना आली जन्मास। जी जी ॥ १ ॥

चाल २ री : प्रिय माझ्या तूं हिंदुस्थाना, तुझ्या लेकरांना, मिळेना खाना, तुझें असून तुझ्या मुलाला। पोटभर नाहीं अन्न त्याला। भिक्षेचें पात्र धरून हाताला। लागले भिक्षा मागण्याला। सूवर्णभूमि नांव तुजला। कुठर गेलं सोनं लयाला। भिक्षाही आली नशीबाला। शेतकरीदादा ॥ २ ॥

चाल ३ री : किति जमीन असून, पडली कष्टा वाचून, धन भरलें खचून, न येतें दिसून, आळसांत फसून, आम्ही बसलो रुतुन, सर्वांनीं करार जर केला। कोठार भिडतील गगनाला। कोण जाइल परराष्ट्राला। धान्याची भिक्षा मागण्याला। लांछन पदरीं घेण्याला। जीर जी ॥ ३ ॥

चाल १ ली : म्हणून आपल्या स्वतंत्र भारताला, ५१ साला, मार्च पहिलीला, मानवी जीवनाच्या उन्नतीस। सरकारनं आंखलें योजनेस पंचवार्षिक नांव खास। जी ॥ ४ ॥
अनिश्चित पावसामुळं, घटलं हें धन, म्हणुन सरकारनं, पाठ बांधाऱ्यांची कामें काढली। योजना ही फार नामी आंखली। दुष्काळाची हकालपट्टी केली। जी ॥ ५ ॥

चाल ४ थी : कित्येक धरणें बांधति । पाट बांधारे विहीरी खोदती । खार जमिनी लागवडी आणती । निरनिराळें कारखाने काढती । सुधारलेल्या बियाणांच्या जाती । कंपोज खड्डे खणती । खते कृत्रिम तयार करती । शेतीचें पडलेलें तुकडे एकत्र आणति । जी ॥ ६ ॥

चालः— पाण्यापासून वीज भरपूर । रस्ते आंखले सर्व देशभर । जी ॥ ७ ॥ घरगुती उद्योगधंद्याला । उत्तेजन कलावंताला । जी ॥ ८ ॥ सामाजिक कार्याकडे खास । सर्वांची लागली आस । जी ॥ ९ ॥

चालः— कामगारांच्या त्या उन्नतीला । ठाइठायीं स्थापिलें केंद्राला । सांभाळण्या त्यांच्या आरोग्याला । दवाखानं जागजाग्याला । दूध देती लहान मुलाला । आणि गर्भवती स्त्रियांला । साक्षर सर्व करण्याला । शिकविती लहान थोरांला । शिवाय त्यांच्या मनोरंजनाला । सर्व सोयीं केल्या केंद्राला । ऐका ॥ १० ॥

चाल— २२८९ कोटी । खर्च येणार हिच्यासाठी । जी ॥ ११ ॥ किति चालली यातायात मोठी । सरकार लागलं तिच्या पाठी । जी ॥ १२ ॥

चालः— नेहरुनीं केलं अव्हान, मोठ्या हिंमतीनं, जगाला जाण, भाक्रा नान्गल धरणाचें । दाखविलें कसब भारताचें । दिपवीले डोळे जगताचे । जी ॥ १३ ॥

याची सांगतो माहिति थोडक्यांत, पंजाब राज्यांत, भारी नखऱ्यांत, लाडाची सतलज सुटली मोकाट । पाण्याचा प्रवाह तिचा अफाट, पावसाळा उन्हाळा दोन्ही कालांत । भारतांत केला तिनं बोभाट । जी ॥ १४ ॥

चालः— काशीबया फार अवखळ। मनमानेल तिकडच वळ।
सोडुनी आपल आळ। पाण्याचा आवाज खळखळ।
वाहतसे साऱ्या रानोमाळ। जसा सुटतो देवाचा पोळ।
तोंड फिरेल तिकडच वळ। अशी बया मोठी अचपळ।
कसं टाकलं तिच्यावर जाळ। ऐका बरं॥ १५॥

चालः— अशा हिच्या अवखळ प्रवाहास, ताब्यांत ठेवण्यास, करुनी विचारास, भारतसरकारनं केली आंखणी। ठरविली जागा दोन ठिकाणीं। ऐका थोडक्यांत गातो कहाणी। जी॥ १६॥

चालः— भाक्रापासून आठ मैलावर। नान्गल जागा सुंदर॥१७॥
साडेतिनशें लक्ष रुपयांत। बांधली घरें झोकांत॥ १८॥
दहा हजार कामगार मजूर। राहू लागले तिथं बिनघोर॥ १९॥ एकूण अडिच हजार इंजिनियर। त्यांत हिंदींची संख्या फार॥ २०॥ एक लाखाहून बघा फार। काम करती रोज कामगार॥ २१॥
सरसा नदीचं पूल पूरं केलं। सहा महिन्यांत काम आटोपलं॥ २२॥

चालः— हिमालयाची देणगी ही सारी। जगांमध्यें उंची त्याची भारी। करीना कोण बरोबरी। त्याचें शिखर कैलासावरी। वर बसून शंकर गौरी। भारताची देखरेख करी। कोणी म्हणे चढून जावूं वरी। कोलमडून पडती कि हो दरी। अशी कैक मरुन गेली खरी। नाहीं पत्ता त्यांचा आजवरी। करता येइना शत्रुला स्वारी। भारताला आधार त्याचा भारी। ऐका बरं॥ २३॥

चालः— हिमालय पडला आजारी। सोसुन त्रास तो भारी। उन, वारा, पावसाच्या सरी। पडत्या त्या नेहमी डुइवरी। जर्जर झाली होती स्वारी। थकलं वैद्य डॉक्टर भारी। जी ॥ २४ ॥

चालः— आजवर इंजीक्शनें देत। सजीवांना करती सशक्त। जी ॥ २५ ॥ जणूं ब्रह्मदेवच आपण। समजे डॉक्टर मोठ्या गर्वानं। जी ॥२६॥ ऐका हिंदी इंजिनियरांची। गोष्ट ती भारी नवलाची ॥ २७ ॥ इंजिक्शन देति दगडाला। शक्ती आणली त्यानीं निर्जीवाला ॥ २८ ॥ पाहून बुद्धीचें माप। परकीयांचा झाला थरकाप ॥२९॥

चालः— हें धरण आशिया खंडांत, शक्तीनें जास्त, लांबी सर्वांत। कुतुबमिनारच्या तिप्पट उंचीचें। जगांमध्यें दुसऱ्यानंबरचें। प्रचंड कार्य हल्ली नाहीं कुणाचें। जी ॥३०॥

चालः— एकावेळीं इतकें इंजिनियर, किति कंत्राटदार, आणि कामगार, कल्पना करा तुम्ही आपली। भारताची ही योजना पहिली। गातो दादांनो बसा खाली। जी ॥३१॥

चालः— लाखो लोक हाइत कामावर। जावून पहा तर खरं।
जणुं काशी तें हरीद्वार। जशी यात्रा भरते खरोखर।
जिथं लोक कष्ट करणार। देव तिथंच हजर राहणार।
अशी तिर्थ हिंदुस्थानभर। सरकारनं काढली भराभर।
संख्या दोनशे चाळीसावर। देव गुंतला इकड कामावर।
मग कशाला पाहूं पंढरपूर। शोधू धरण, पाट, बांधार।
तरच देव खरा भेटणार। आम्हाला दादा। ॥ ३२ ॥
हेंच आमचें तें रामेश्वर। हिच काशी प्रयाग हरिद्वार।
हेंच खरें बद्रिकेश्वर। देहु आळंदी पंढरपूर।

हेंच नाशीक त्रंबकेश्वर। हीच गया द्वारका हरीहर।
हेंच मक्का मदीना थोर। हेंच सिमला माथेरान गार।
हेंच चर्च, मशीद मंदीर। इथंच आमचं कल्याण होणार।
चला उठा जावूं भराभर। दर्शन घेवूं सत्वर।
पापांचा होइल संहार। ध्यानी घ्या दादा ॥ ३२ ॥

चालः— किति वाहनें किति मोटार। करताती कामं भराभर।
बांधिले बोगद आरपार। अर्ध्या मैलाचा तो सुमार।
दोन नळ केलं तयार। उंची त्यांची ५० फुटावर।
यांतुनच पाणी जाणार। दाब कमी तटावर पडणार।
बांधिला तट भेसूर। इंजेक्शन देति वारुंवार।
शक्ती त्याला फार येणार। भिति मुळीच नाही उरणार।
ऐका ॥ ३४ ॥

चालः— आठ मैलाचा कालवा इथवर। नान्गलचं पाणी ते सारं।
आणून सोडलं पूर। आठ जुलैए चोपन या मुहुर्तावर।
आमुचा नेता जो प्यार। नांव शोभे पंडित जवाहर।
उद्‌घाटन हेच करणार। बटन दाबतांच पाणी तें सुटलें
फार जोरदार ॥ ३५ ॥

चालः— दोन्हीकडच्या दोन नळातुनी। पाणी तें सोडलं आणुनी।
जी ॥ ३६ ॥

भाग २ रा

नांव भल मोठं लक्षणीं। पण आंगांत नाहीं करणी ॥३५॥
कोण म्हणेल सांगा राजस्थान। जिकड तिकड वाळुचेंच
रान। पण वरील पाण्यापासून। कसं झालं घ्याहो
ऐकून ॥ ३७ ॥

चालः— हिरवा गार गालीचा सृष्टीच्या मुलीनं अंथरला। आहे खरी देवता वनाची नांव शोभे तिजला। जी ॥ ३८ ॥ हिमालयाची जादु मोठी करी लोखंडाचं सोनं। तसं वाळवंटाचं सुंदर झालें भव्य नंदनवन ॥ ३९ ॥ जाईजुई सेवंती लागल्या हार गुंफण्याला। चाफा मोगरा गुलाब यानीं गुच्छ तयार केला ॥ ४० ॥ भारत मातेनं लाडक्या नेत्याच्या गळीं हार घातला। वनदेवीनं गुच्छ केलेला हातामध्यें दिधला ॥ ४१ ॥ पेप्सु राजस्थान पंजाब यांना आनंद फार झाला। तीन हजार मैलाचे कालवे धरले गणतीला ॥ ४२ ॥ दहा लाख किलोव्हॅट विद्युत शक्ती होईल तयार। एककोट चाळीस लक्ष माणसांच्या शक्तीचा सुमार ॥ ४३ ॥

चालः— हा झाला पुरा एक बांध, दुसरा हिराकुंड, महानदी धुंद, चालली होती मस्त ओरिसा राज्यांत। थोडक्यांत सांगतो तिचा वृतांत। माती किति लागली ठेवा ध्यानांत। जी ॥ ४४ ॥ दिल्ली तें कन्याकुमारीपर्यंत, पहा नकाशांत, अंतर किति होत, चौदाचें पन्नास मैल लांबीचा। खरोखर नऊ फुट उंचीचा। आणखीन दहा फूट रुंदीचा। रस्ता झाला असता नुसत्या मातीचा ॥ ४५ ॥ याच्यावरून येइल कल्पना, इतरांची जाणा, तुम्हा श्रोत्यांना, पुढें ऐका बिहार राज्यामधली। दामोदर नदीच्या खोऱ्यांतली बोकारो तिल्ल्या पुरी झाली। दुर्गापूर, पंचायत डोंगर, मायथान कोनार, कामें चालली। जी ॥ ४६ ॥

चालः— दक्षिण भारतांतील तुंगभद्रा आणि लोअर भवानी।
या दोन धरणांची कामें चालली ध्याहो ऐकोनी ॥४७॥

११ क्रमांक २३५५३ दि: ...
क्रमांक ...... नों: दि ......

कर्नाटकांतील घटप्रभेचें धरण मोठं छान ।
काक्रापाडा हें गुजराथमधील बांधलं हौसनं ॥ ४८ ॥
महाराष्ट्रांतील वैतर्णा धरण झालं बघा पूरं ।
दुसर गंगापूर नाशीक जिल्ह्यांत गोदावरीवर ॥ ४९ ॥

चालः— आतां सांगतो कारखान्यांची माहिती, काढले किती, जरा बसा खालती । बंगाल्यांत शहर चित्तरंजन । तयार होती तिथं रेल्वे इंजन । दर वर्षाला दोनशे नवीन । जी ॥ ५० ॥ बिहार राज्यांत शिंद्रीगावाला, कारखाना काढला, फार चांगला, आमोनियम सल्फेट तयार करती । रासायनिक खत त्याला म्हणती । याचमुळें धान्यांत झाली बढती । जी ॥ ५१ ॥ धान्याचा आजचा साठा, किति आहे मोठा, भरून काढला तोटा, बचत रुपये एकशें छत्तीस कोट । थांबविली त्यांची बाहेरची वाट । गरीबांची भरूं लागली पोटं । जी ॥ ५२ ॥

चालः— सोन्याची खाण म्हैसूर, विमान भराभर, होती तयार, निश्चित जावूं आम्ही वैकुंठाला । अडथळा मुळीच नाहीं उरला । आकाशांत गमन करण्याला । शत्रुवर नजर ठेवण्याला । आणिक मालाच्या वाहतुकीला । तयार करती गाड्या मोटारीला । प्रवास यानें सुलभ आमचा झाला । सोय झाली जमीन आकाशाला । सागराचा तट तिन्ही बाजुला । जलदीनं तोही खुला केला । आगबोटी करती आरमाराला । विशाखापट्टण बंदराला । जहाज बोटींचा कारखाना काढला । ऐका ॥ ५३ ॥ संशोधन प्रयोग करण्याला । ११ राष्ट्रिय शाळा काढल्या । शिवाय दूरच्या बातमीला । संगीत गाणी, पोवाड्याला ।

घर बसल्या ऐकती भाषणाला। टेलिफोन रेडिओ तयार केला। ट्रॅक्टर्स शिलाइ यंत्राला। किति किति सांगु दादा तुम्हाला। सांगुन सांगुन जीव दमला। अशा किति तरी योजनेला। लहानमोठ्या दोनशे-चाळीसाला। तारीख २९ अखेरीला। फेब्रुवारी छप्पन सालाला। पांच वर्षे होतील योजनेला। ऐ० ॥ ५४ ॥

चालः— काल परवाच एका बंदराला, नऊ एप्रिलला, पंचावन साला, भारताच्या पश्चिम किनाऱ्याला। सोहळा एक मोठा साजरा झाला कांडला नांवाच्या बंदराला। मुहुर्तानें सुरु तें करण्याला। केंद्रिय वाहतुक मंत्री आला। लाल बहादूर नांव त्याला त्यांच्या हस्ते मुहुर्त झाला। ऐका बरं दादा ॥ ५५ ॥

चालः— पुढील पंच वार्षिक योजना, भविष्य ते जाणा, किति नद्यांना, धरण, पाट, कालवे अन बांधारे। आंखुन ठेवली ऐका सारे। सुटेल भारती सुगंधी वारे। जी ॥५६॥

चालः— मिना, निरा, भिमा, आणखी कृष्णा, कोयना। जी ॥ ५७ ॥ मुळामुठा, घोड, तापी, ती पहा गीरणा। जी ॥ ५८ ॥ ही धरणें पुरी झालेवर किति जमीनींना। जी ॥ ५९ ॥ भिजणार पंचवीस लाख एकर जमीन ठेवा ध्याना ॥ ६० ॥

चालः— फिटला भारत मातेचा पांग, परकीयांचा चंग, झाला भयाभंग, जगाची नजर लागली इकडे। भारताची वाहवा चोहिकडे ऐका दादानो सरा पुढें। जी ॥ ६१ ॥ कवी जगन्नाथ हा दास, सेवा करण्यास, सदा हमखास, देशापायीं शाहिरी पार्टी काढली। शास्त्रोक्त गाण्यास

चाट मारली। पंचवार्षिक योजना पहिली। तिची ही कवन माला गुंफली। भारतमातेच्या चरणीं वाहिली। जी ॥ ६२ ॥

चालः— गेले सोडुनी बापुजी भारता। दुबळी झाली ही सारी जनता। सत्य अहिंसा मंत्र दिधला। शांतीचा मार्ग दाखविला। साऱ्या जगांत श्रेष्ठ ठरला। वीर आमुचा जवाहर नेता॥ बापुजींचा वारस खरा पुरता, पुरता ॥ ध्रु ॥ त्याग हिमालयाहुन मोठा। कधीं वाणींत पडेना खोटा। जसा सागरीं ज्ञानाचा सांठा। थकला नेहरू शांतता सत्याला। पण शांती नाहीं त्यांच्याकरिता, करिता ॥ ध्रु ॥ म्हणे जगन्नाथ कवीराय। हाच काहो जगाचा तो न्याय। पुज्यबापुनीं सांगितले काय। त्याच मार्गानें जाऊया आतां॥ तरच शांती मिळेल या जगता, जगता ॥ धृ ॥ ६४ ॥

★

# " कामधेनु दुजा साक्षात् "

" स्वातंत्र्य-प्राप्ति ":— [ अनुष्टुप ]

ऑगस्टमासच्या मध्यें । पंधरावा दिनांक तो ।
त्या रात्रीं हिंदभूमीला । प्रिय स्वातंत्र्य प्राप्त हो ॥ १ ॥
अवर्णनीय आनंद । होता स्वातंत्र्यप्राप्तिचा ।
नर जो श्रेष्ठ त्याला तो । कळे आनंद मुक्तिचा ॥ २ ॥
शिकस्त आपुली केली । जिंकण्या नेतृमंडळें ।
रक्षार्थ स्वगृहाच्या तैं । आंग्लशाही घरीं पळें ॥ ३ ॥

स्वातंत्र्यप्राप्तिच्या पश्चात् । "महात्माजी" दिवंगत ।
जाहले अल्पकालानें । दावुनी दिव्य तो पथ ॥ ४ ॥

**पहिली सफल योजनाः—**

हिंदभू प्रिय-स्वातंत्र्य । स्थिर केलें जवाहरें ।
अन् स्वयें स्थापिली शीघ्र । सत्वरें लोकशाहि ती ॥ ५ ॥
कल्याणार्थ जनांच्या त्या । गृहसर्वस्व त्यागिलें ।
कल्याणकारि तें राज्य । निरपेक्षेच निर्मिलें ॥ ६ ॥
लोकांच्या योगक्षेमार्थ । अर्थशास्त्रानुसार ती ।
योजना पहिली भव्या । योजिली पंचवार्षिकी ॥ ७ ॥
पहिलीं पांच वर्षें तीं । सरली अति सत्त्वर ।
घडली योजना तेव्हां । दुसरी बलवत्तर ॥ ८ ॥
पहिल्या योजने योगें । अन्नोत्पादन वाढलें ।
वर्धली वीज-शक्ति ती । तद्वत् उत्पन्न-राष्ट्रिय ॥ ९ ॥
पहिली योजना झाली । सफला सुफला अशी ।
योजिली दुसरी तेव्हां । पंचवार्षिक तादृशी ॥ १० ॥
आपुली हिंदभू आहे । सुफला सस्यश्यामला ।
तदर्थ योजिल्या येथें । सुनदी-तट-योजना ॥ ११ ॥
अन्न-उत्पादनीं सिद्ध । सुनदी-तट-योजना ।
सफला ठरल्या आणि-त्याज्य त्या युद्ध-योजना ॥ १२ ॥

**शिक्षण-प्रसारः—**

नागरीक भविष्याचे । गृहरत्नेंच बालकें ।
तदुज्ज्वल भविष्यार्थ । पंचवार्षिक योजना ॥ १३ ॥
भारतीं शेकडेवारी । शैक्षणिक अती लघु ।
समाजशिक्षणावाही । पंचवार्षिक योजना ॥ १४ ॥

प्रौढांच्या शिक्षणासाठीं । प्रौढ–शिक्षण–योजना ।
मान्य ती भारता नाहीं । कदापि "रण-योजना" ॥ १५ ॥
भारती साक्षरता ती । व्हावी बहुजनामधें ।
"दृक्-श्राव्य"–पद्धती दोन्ही । योजिल्या शिक्षणामधें ॥१६॥
उच्च त्या शिक्षणासाठीं । नाना विद्या तथा कला ।
कल्पिल्या योजनेमाजीं । नेमाजी, क्रम आपुला ॥ १८ ॥

## सामाजिक सुधारणा:—

अस्पृश्यता निवारा हो । राहो बाजूस सर्व तें ।
हिंदभू–घातकी ही हो । सामाजिक कलंक हा ॥ १९ ॥
निवारणार्थ – या पापा । हरिजनोत्कर्ष साधण्या ।
त्या त्या दिला मुभा त्यांना । शिक्षणीं, नोकऱ्यांमधीं ॥२०॥
दैन्य तें सलतें नेत्रा । प्रिय भारतभूमिचें ।
शीघ्र तें नष्ट व्हावें हें । सदुद्दिष्ट हिच्यामधें ॥ २१ ॥
विकास–योजने योगें । साध्य तें होय सत्वरें ।
तदर्थ महती मोठी । योजनेची जनामधें ॥ २२ ॥
" यज्ञात् भवति पर्जन्यः " । भगवन्तोपदेश हा ।
परन्तु कलिकालीं या । 'श्रमयज्ञ'च श्रेष्ठ तो ॥ २३ ॥
" भूदान–यज्ञ " तोही हो । विनोबाजी महर्षिचा ।
नयज्ञ म्हणती त्यातें । जणु वेदाची ही ऋचा ॥ २४ ॥

## मद्यपानबंदी:—

कुटुंब–घातकी आहे । सर्वथा त्याज्य ती सूरा ।
निषिद्ध भारती व्हावी । म्हणूनि करिती त्वरा ॥ २५ ॥
'गौडी', 'माध्वी' तथा 'पैष्टी' । जी निषेधी सुरा तिन्ही ।
ती सर्वा सुखदा आहे । पंचवर्षीय योजना ॥ २६ ॥

### योजनांची महतीः—

योजना या जनासांठीं। योजिल्या रशियामधें।
अन्योन्य सहकारानें। ठरल्या त्या यशस्विनी ॥ २७ ॥
पांच अन् परिपूर्णा त्या। योजना पंचवार्षिक।
जाहल्या रशियामध्यें। सहावी सुरु सांप्रत ॥ २८ ॥
सुपरिणत पाहूनि। पांच त्या योजना तिथें।
सहावी हवी आम्हाला। जन ते म्हणु लागले ॥ २९ ॥
अन्यत्र लोकशाहीच्या। इतिहासावलोकनें।
निष्पन्न ठरतें हें कीं। "सहकार, महाबली" ॥ ३० ॥

### सामुदायिक विकासः—

राष्ट्राची प्रगती व्हावी। विकासें सामुदायिकें।
म्हणूनी घडल्या त्या त्या। शिक्षणादि सुयोजना ॥ ३१ ॥
दुसऱ्या योजनेमाजीं। नेमिला खर्च तो महा।
समुदाय—विकासार्थ। दोनशे-कोटिचा पहा ॥ ३२ ॥
सामुदायिक शेतीचा। प्रयोग सुरु सांप्रत।
करणें इष्ट तो आहे। लाभदायक निश्चित ॥ ३३ ॥
वाहतूक विकासार्थ। पथ-पूरक बांधले।
सुमाता-बालकें यांचें। आयुरारोग्य रक्षिलें ॥ ३४ ॥
सहनाववतु" इत्यादि। मंत्रीं इंगित हेंच कीं।
सहकार करा तुम्ही। शीघ्र उत्कर्ष व्हावया ॥ ३५ ॥
सरकार सदा योजी। जन कल्याण-योजना।
सहकार करा त्यांशी। शीघ्र उत्कर्ष व्हावया ॥ ३६ ॥
सर्वत्र दिसतें हें कीं। सिद्धी, संधींच या युगीं।
विकास-योजने माजीं। आहे हें तत्त्व गोविलें ॥ ३७ ॥

( भुजंगप्रयात )

जनांनो तुम्ही या वरा योजनला ।
तुम्ही स्वीकरा श्रेष्ठ आयोजनाला ॥
करा लाभदा लोकशाही जगाला ।
अन् त्रिलोकीं तसा श्रेष्ठ या भारताला ॥ ३८ ॥

( मालिनी )

जय जय जय होवो आपुल्या भारताचा ।
जय जय जगीं होतो सर्व सद्भावनांचा ॥
सफल सुफल होवोत् सर्व ही, योजना या ।
*सहकृतिच बलिष्ठा राष्ट्र–उत्कर्ष व्हाया ॥ ३९ ॥

( अनुष्टुप )

हातच्या कांकणाला तो । आरसा दाविणें वृथा ।
कामधेनु दुजी साक्षात् । पंचवार्षिक योजना ॥४०॥

या. वि. देवासकर, बडोदे.

★

# सुंदर अमुचा गांव

[ विकास योजनेंतील एक आदर्श गांव ]

सुंदर अमुचा गांव, खरोखर, सुंदर अमुचा गांव ॥ ध्रु० ॥
रुंद कालवा धरणापासुन
द्रुत्गतिनें हा वळणें घेऊन
दुष्काळावर दारिद्र्यावर; घालित ये निज घाव ॥ १ ॥

* सहकृति=सहकार.

फळां फुलांनीं मोहरलेलें
अन्य पिकांनीं गजबजलेले
शिवार सारे कृषीबलाच्या; अंतरिचा घे ठाव ॥ २ ॥

आदर्श ऐसे शालामंदिर
ज्ञानदीप तेवुनी निरंतर
अज्ञ तमाला टाकी ग्रासुनि; उजळे सारा गांव ॥ ३ ॥

नवी रुंद ही सडक खडीची
ही तर किमया श्रमदानाची
तालुक्यास ती घाली खेपा, एस्. टी. बस भरधांव ॥ ४ ॥

इथें न थारा जातियतेला
भाऊबंदकी आणि दुहीला
जाणिव हृदयीं ऐक्य नि समता, बंधुत्वाचा भाव ॥ ५ ॥

दारूचें नच व्यसन कुणाला
कष्टाचा तो छंदहि सकला
मुळीं न ठावें अमुच्या गांवा, बेकारीचें नांव ॥ ६ ॥

कार्यक्षम अमुची 'पंचायत'
सेवाकार्यीं झटुनी अविरत
आरोग्याचें करिते पालन, रोगाला नच वाव ॥ ७ ॥

झालें उन्नत ग्रामोद्योग
आलस्याचा सरला भोग
स्वयंपूर्ण अन् वैभवशाली, छोटासा हा गांव ॥ ८ ॥

कवि—अ. जि. हुपरे उर्फ अनंत हुपरीकर, मिरज

★

# समाज जीवन शिक्षण

॥ पुराण ॥

## अध्याय १ ला

श्रीगणेशायनमः ॥ श्रीगुरुदेवायनमः ॥ स्वराज्य प्राप्तीनंतर। चैतन्य वारे सुटले फार। त्या मध्यें अग्रेसर। शिक्षण प्रसार दाटला ॥ १ ॥ पंडित बैसले एके ठायीं। विचार करिती लवलाही। कीं, भारती योग्य शिक्षण नाहीं। केसे असावे आजला ॥ २ ॥ मग झाला थोर विचार। उत्तम नागरीक निपजणार। हेंच शिक्षणाचें सार। ऐसें वाटतें सर्वांना ॥ ३ ॥ वर्धा शिक्षण योजना। हीच खरी लोक कल्याणा। मंथून निघाली भव्य योजना। दुज्या कल्पना निमाल्या ॥ ४ ॥ पूज्य बापूजींचा विचार। आनंदे दाटले नारीनर। झाला भारत देशी प्रचार। ऐका चित्त देऊनि ॥ ५ ॥ नुसते पुस्तकांतील ज्ञान। नको नको ते शहाणपण। कृती करता ये शिक्षण। तीच पद्धति असावी ॥ ६ ॥ प्राथमिक शिक्षकास। ज्ञान याचे पाहिजे खास। ते नसता बालकास। ज्ञान कैसेची लाभणें ॥ ७ ॥ कूपांत नसता पोहऱ्यांत। कैसे जीवन मिळेल यथार्थ। बाले तर तृषाक्रांत। अंधकारांत बैसला ॥ ८ ॥ काढिली अध्यापन विद्यालयें। शिक्षक घेती ज्ञान स्वये। दिवा भीते ज्ञान भये। धुत्कार करिती अंधारीं ॥ ९ ॥ सूतकाताई ठायीं ठायीं। टकळी चरखे फिरविण्या घाई। स्वच्छंदे डुलती कांहीं। ईर्श्या दाटे चहुकडे ॥ १० ॥ कांहीं त णे तयार करिती। कित्येक सुंदर कापड विणीती। कांहींची असे शिघ्रगती। तुलीता बुद्धि कुंठिता ॥ ११ ॥ कोठें चाले कागद काम। पंखे हार करिती उत्तम। मालांची वेस्टनें संपूर्ण झळकती चोंहीकडे ॥ १२ ॥ काष्ठांचे नमुने विविध। एकाग्र चित्तें करिती सुखद। कलेमाजी

वस्तु प्रसिद्ध । प्रदर्शनामाजी झळकती ॥१३॥ भारत असे कृषिप्रधन । त्यांत चाले शेतकी शिक्षण । बाले श्रमती मोदे करून । श्रेष्ठी कौतुक वाटते ॥ १४ ॥ हाच समवाय चाले सुगम । विषयांचा यांतून उगम । व्यवहार ज्ञान अनुपम । जीवन शिक्षण संबोधिले ॥ १५ ॥ ऐशी या शिक्षणाची व्याप्ती । यातून थोडीफार होते प्राप्ती। कोणावरीही नाहीं सक्ती। सरकार उत्पादन घेतसे ॥ १६ ॥ चहुंकडे आता शाला मंदिरें । या व्याप्तीची होणार निर्धारे । सर्व जनतेच्या आधारे । कार्य सिद्धिस जाईल ॥ १७ ॥ शिक्षक आणि सर्व समाज । एकत्र यावेत रोजच्या रोज । तेणें शिक्षणाचें काज । यशो मंदिरा गाठील ॥ १८ ॥ यास्तव शिक्षक बंधु भगिनी । उपेक्षू नका ही बोलणी । आचरणी आणा क्षणोक्षणी । तेणें तराल भवाब्धी ॥ १९ ॥ भारती खेडी असती असंख्य । त्यांत तुम्ही ज्ञानी मुख्य । जनतेत होईल येणे सख्य । उद्धार होईल सर्वांचा ॥ २० ॥ आधि शिका मग शिकवा । आधि वागा मग बाले वागवा । काळना व्यर्थची जावा । ऐसे जाणा अंतरी ॥ २१ ॥ समाज शिक्षणाचे अंग । त्यातील जाणा अंतरंग । कृतीचा बांधुनिया चंग । तत्पर व्हावें सत्वरी ॥ २२ ॥ आता शिक्षण शिबिरे भरती । नवनीत न्यायथा शक्ति । बाले शिकवा यथामती । देशोद्धार करावा ॥ २३ ॥ प्रथमाध्यायी पूर्व कथन। सांगितले यथामती जाण । गुरुजन ज्ञाते विचिक्षण। घेतील सार संग्रही ॥ २४ ॥ पुढील अध्यायी शिबिर वर्णन। वर्णिले अल्पबुद्धी असून । श्रोते परिसोत भावे करून । मस्तक चरणी ठेवितो॥ २५ ॥ पाडळी ग्राम नामवंत । तेथीचा पांडुरंग बळवंत । तुम्ही सर्व भाग्यवंत । समयोचति वदतसे ॥ २६ ॥ श्रीगजाननार्पणमस्तु ॥

कविः—पांडुरंग बाळाजी ढाणे

★

# सत्य कहाणी

सत्य कहाणी मी सांगतो तुम्हाला ॥धृ०॥

विरुळ गांवी राहत होता, धनाढ्य सावकार लौकीक मोठा
लोळत होती पाया पाशी, बनुनिया लक्ष्मी देवी दासी
नोकर चाकर कमी नाही, अशी होती त्याची राजेशाही
राजे शाहीचा हो नाश झाला ॥ १ ॥

दारुडे मित्र म्हणत होती, सावकाराशी लावा 'हिची' प्रिती
होईल साथी हा आपल्याला, पैशा अधल्याचा प्रश्न मिटला
हळूहळू सावकार दारुड्या झाला, दारुड्यार्शी हो आनंद झाला
सावकार म्हणे अमृत दारुला ॥ २ ॥

सावकार लोळे दारु पिऊनी, रोजची कामें दिली सोडूनी
रडती बायको नि पोर सारे, समजावी ते पित्या प्रेमभरे
सावकार म्हणे कळते मला, 'तुम्ही नको मज सांगायाला'
इस्टेट सारी विकू लागला ॥ ३ ॥

हळुहळू गेली इस्टेट सारी, दारुपायी तो बनला भिकारी
बायकोने हो निश्चय केला, जाऊं राहाया माहेराला
बायको गेली माहेराला, सावकाराशी हो पश्चाताप झाला
म्हणू लागला 'विष' दारुला ॥ ४ ॥

सावकार गेला सासरला, बायकोची क्षमा मागायाला
सांगू लागला बायकोशीं, 'नाही होणार चुक पुन्हा अशी'
सावकाराची अशी झाली फजिती, नका लावू तुम्ही दारुची प्रिती
प्रेमाने 'भाऊ' सांगतो तुम्हाला ॥ ५ ॥

रामभाऊ भोयर

★

मराठी ग्रंथ संग्रहालय
९००३८

# आदर्श खेडें

कविः—**तु. बा. बेंडाळे** साहित्य विशारद

देशाच्या विकास योजनेच्या सरकारी स्पर्धेसाठीं खालील आदर्श खेडें ही कविता व दलितोद्धार ही दुसरी व तिसरी झाड या कविता पाठविल्या आहेत.

आपल्या या हिंदुस्थान देशांत हजारों खेडीं आहेत खेड्यांची सर्वांगीण सुधारणा होण्यास अनेक गोष्टींची आवश्यकता आहे. सामाजिक विकास होण्यासाठीं प्रथम खेडेगांवची सुधारणा होणें आवश्यक आहे. आदर्श खेडें कसें असावें हें खालील कवितेंत प्रतीत केलें आहे.

**आनंदाचें स्थान । खरोखर । खेडें सुंदर छान ।**
**खरोखर खेडें सुंदर छान ॥ ध्रु० ॥**

**वृक्ष विलसती नयन मनोहर**
**सुखसोयी घरदार सभोंवर**
**जिथें स्वच्छता वसे गांवभर**
**आरोग्याचें स्थान ॥ १ ॥ खरोखर**

**कष्ट कष्टमय जीवन कंठुन**
**अन्न, वसन धन करि उत्पादन**
**दीनांचा घे कैवार जिथें जन**
**सेवा हें महिमान ॥ २ ॥ खरोखर**

**सहाय्य सेवा नित्य निरंतर**
**स्नेहाचे संबंध परस्पर**
**प्रेमभावना वसे घरोघर**
**शांतीचेंच ठिकाण ॥ ३ ॥ खरोखर**

**साधेपण परि उच्च विचारा**
**भाविकतेचा भव्य मनोरा**

गुलामगिरिला जिथें न थारा
स्वातंत्र्याचें स्थान ॥ ४ ॥ खरोखर

कर्तव्याची जिथें जागृति
स्वावलंबी नित नांदे वृत्ति
संस्कृतीस सन्मान ॥ ५ ॥ खरोखर

फंद फितूरी जिथें न भांडण
मत्सर द्वेषा दे उच्चाटण
ऐक्य अंतरीं वसे संघटन
संघशक्ति निर्माण ॥ ६ ॥ खरोखर

संयम शक्ति बुद्धि जेथें
निर्भयता मनिं शुद्धि वसते
जीवन कार्या स्फूर्ति मिळते
निर्मळ वसतिस्थान ॥ ७ ॥ खरोखर

सत्य अहिंसा सदैव पालन
समाजसेवा व्यक्ति विकसन
मानवतेचें महत्वमापन
जेथें हो उत्थान ॥ ८ ॥ खरोखर

मानि न जेथें उच्चनीचपण
जातियतेला समूळ नष्टुन
अज्ञानाला दूर घालवून
माणुसकीला मान ॥ ९ ॥ खरोखर

स्वराज्य समता जेथें नांदुन
बंधुभावना नसानसांतुन
न्यायदेवता विहरे त्यांतुन
लोकशाही स्थान ॥१०॥ खरोखर

★

# वैभव दडलें निज कष्टांतच !

या मित्रांनों, चला पाहु या भारत देश महान हा !
देशा देशांतुन पसरली कीर्ति ज्याची आज महा ॥
शिवरायानें राज्य स्थापिलें शक्ति-युक्तिने, स्नेहाने
वाढ तयाची केली होती पहिल्या बाजिरावानें
दुही पाडुनी तया भंगलें; पाय रोवलें परक्याने
जुलमी शासन केलें ज्यांनी त्यांचा तो इतिहास पहा ॥ १ ॥
बंड क्रांतीच्या ठिणग्या झडल्या अनेकदां या देशांत
तरुण मनें तीं बोलुन गेलीं बलिदानाच्या भाषेंत
कितीएकांनी दिल्या आहुति यज्ञास्तव आवेषांत
त्यागाला त्या सीमा कुठली ! त्याग तयांचा थोर अहा ॥ २ ॥
नंतर आला "शांतिदूत" तो हिंदी जनांच्या कल्याणा
"सत्याग्रह" हें शस्त्र जयाचें; सत्य, अहिंसा' हा बाणा
दलितांचा उद्धार, तसा तो हरिजन प्यारा 'बापूंना'
जनशक्तितुन केला त्यांनी भारत आपला मुक्त हा ॥ ३ ॥
'नेताजी' अन् 'जवाहरा'सम सुपुत लाभलें मातेला
हांक तयांचि येतां जनता उभी ठाकली हांकेला
'लोकशाही' नि समाजवादी राज्य मिळाले आपणांला
करावया उत्कर्ष तयाचा - वेंचु आपुलें कष्ट महा ॥ ४ ॥
धरणें बांधुन, पिकवूं शेतें; करूं सुबत्ता राष्ट्रांत
हातमाग नि गिरण्यामधुनी वस्त्रें विणूं या जोमांत
औषधालयें शाळा तैशा उघडूं खेड्यापाड्यांत
वैभव दडलें निज कष्टांतच; युवयुवतींनो नीट पहा ॥ ५ ॥

—मनोहर देखणे

★

# दुसरी पंचवार्षिक योजना

पंचवार्षिक योजना ही यशस्वी करणार !
आम्ही यशस्वी करणार ॥ धृ० ॥

कोयना, कोसी करुन आम्ही
बिजली चमकवणार !
विजेला राबवून घेणार
बरकत धंद्याला येणार
शेतकऱ्याच्या झोपडीतही बिजली झगझगणार ! १

पाटबंधारे जागोजागीं
आम्ही पुरे करणार
खोरी सुपीक रे होणार
तांदुळ खूप खूप पिकणार
अन्नधान्य पिकवोनी आम्ही स्वावलंबि होणार ! २

उद्योगधंदे हाति घेउनि
उत्पादन करणार
श्रमाचा मोबदला घेणार
आमची बेकारी जाणार
ग्रामोद्योगही खेडोपाडी झोंपडीत करणार ! ३

बांधकामही हाति घेउनि
इमारती करणार
निवारा सर्वांना मिळणार
शहरांत कामगार हो रहाणार
पडजागांवर नवीन चाळी हवाशीर होणार ! ४

प्राथमिक शिक्षण सक्तीचें
सर्वांना करणार
आम्ही सुशिक्षित बनणार
भराभर सुशिक्षित करणार
प्रौढासाठीं काढुनि शाळा साक्षर त्या करणार ! ५

समाज विकास करण्यासाठीं
खेडोपाडी जाणार
खेडीं नमुनेदार होणार
सुशिक्षित खेड्यांतच रमणार
गांव मदतिनें रस्ते करुनी सुख सोयी पहाणार ! ६

रेल्वे इंजिनें देशांत बनवुन
आगगाडी पळणार
भराभर आगगाडी पळणार
गर्दी कमी कमी होणार
तिसऱ्या वर्गाच्या डब्यामधेंही सुखसोयी होणार ! ७

लहान लहान गांवातसुद्धां
डाकघरें होणार
पत्रें वेळेवर मिळणार
बाजारभाव आम्हां कळणार
मुंबईपासुन एका दिवसांत पत्र घरीं येणार ! ८

खेडोपाडी औषधपाणी
सर्वांना मिळणार
कोठें दवाखाने होणार
कोठें मोटार हो फिरणार
हळुहळु डॉक्टरवैद्यांची संख्या वाढवणार ! ९

कल्याण केंद्रे जागोजागीं
देशात रे होणार
मुलांना दूध प्याला मिळणार
माता निरोगी रे रहाणार
वैद्यकीय सल्ला सर्वांना फुकट फुकट मिळणार ! १०

कुटुंब–नियोजन करुनी आम्ही
रहाणी वाढवणार !
मुलांना धष्टपुष्ट करणार
शिक्षण पुरे पुरे देणार
संख्येपेक्षां बलानें आम्ही वरचढ रे रहाणार ! ११

प्रादेशिक सैन्यांत जाउनि
सैनिक आम्ही बनणार
कोणी विमानांत फिरणार
कोणी दर्यावर जाणार
वक्रदृष्टिनें कोण भारता जगामधें पाहाणार ! १२

—बा. रा. माणगांवे

★

# आतां नवा विचार !

( १ ) सासा साधपम

आतां नवा विचार, आतां नवा आचार
आतां समतेची आम्हां तहान ।
मम पधप धनि रे सा
करूं नवा निर्धार, ठोकूं नवी ललकार
उंच समतेचं लावूं निशाण ।। ध्रु० ।।

आमुच्या एकीच्या शब्दांमधून, तेज सूर्याचें संचारलें
मम मपम पधपधम मम पधप धनि॒मानी॒ध

आमुच्या क्रांतीच्या हांकेमधून, जग उद्यांचे मोहोरलें
चढूं जुनी चढण, घडवूं नवी घडण
नी॒नी॒नी॒सानी॒ध धध धनी॒धप
शिल्प नवीन खोदूं महान् ॥ १ ॥
धध नीसोनीसोनी धपमम

आमुच्या कर्मांचे आम्ही धनी, कोटि हातांत भविष्य रे
आमुच्या धर्मांचे आम्ही ऋणी, जागूं माणुसकीला खरे
नवी धरून वाट, मुखी शांतीचा पाठ
फुलवूं देशांत सुखाचं गान ॥ २ ॥

नद्या, नाल्यांचें पाणी सगळें, खालीं सागरीं वाहात गेलें
जमीन धुपून सगळी गेली, जंगल ओसाड सारें झालें
आतां थांबवूं मरण, बांधू भव्य धरण
पिकवूं मोत्याचं मंगल रान ॥ ३ ॥

एका धरतीची आम्ही मुलं, बंधु भावना आमचं मूळ
फुलवूं प्रेमाची हंसरी फुलं, लावूं सौख्याचें शेत मळं
नाहीं कुणी कमी, नाहीं कुणी धनी
सगळे आहोंत आम्ही समान ॥ ४ ॥

आतां मालक नाहीं कुणी, जमीन सर्वांची कसूं मिळूनी
आतां पिळणार नाहीं कुणी, घेऊं वांटून सर्व मिळूनी
चंद्र, सूर्य, तारे; हवा, पाणी, वारे
तसं देवाचं सगळं हें रान ॥ ५ ॥

बांध–बंदिस्ती करूं आतां, खोदूं तलाव श्रमुनी स्वता
काम देऊं या रिकाम्या हातां, श्रमदेवाची लिहूं या गाथा
बांधूं नवा रस्ता, खाऊं आतां खस्ता
करूं गांवाचं स्वरूप छान ॥ ६ ॥

नको भांडण–तंटा तसा, महारवाडाही लांब असा
नको दारूचा राक्षस तसा, गाडूं उकिरडा घाण असा
घेऊं नवं शिक्षण, करूं आपलं रक्षण
ग्रामस्वराज्य स्थापूं महान् ॥ ७ ॥

—राजा मंगळवेढेकर

★

# भुकेला कोंडा

भुकेला कोंडा, निजायला धोंडा,
दाहि दिशांची कांबळ झकास !
शेतांत खपतांना, यंत्रावर बसतांना,
देशाचा अम्हांला असंतोय ध्यास ॥ १ ॥

स्वातंत्र्यांतिल कांदा भाकर,
गोड लागते अम्हांस,
परवशतेंतील पक्वान्नांची
चव असते कां कोणास ? ॥ २ ॥

सूज्ञ बोलती, " बेकारीचें
भूत भिवविते जनतेस,
दारिद्र्याचा भस्मासूर अन्
भस्म करितसे सकलांस " ॥ ३ ॥

या सूज्ञांना काय सांगणें
श्रम करणें ना ठाऊक ज्यांस,
" निढळाची ह्रो खातो भाकर
देऊं खांदा दारिद्र्यास " ॥ ४ ॥

आम्हींच राजे, आम्हींच सेवक,
इथें कुणाची नसे मिजास,
द्वितीय योजना पार पाडुनी
आतां साधणें समाज-विकास ॥ ५ ॥

रस्ते, शाळा, धरणें बांधूं,
वैभव आणूं या देशास,
काम आपुलें, नसे दुजाचें,
उद्योगाची धराच कास ॥ ६ ॥

कविता-रचयिता—मत्स्येंद्र देशमुख

★

# जपानी भातशेती

मातीतुनिया पिकतील मोती । भाग्वान् तू शेतधनी ।
नवी रीत ही ऐकूं जपानी । भातशेतीची संजिवनी ॥
जेथे जेथे पाणी तेथे । तीन पटीनें पीक निघे ।
एक बिजाला अनेक फुटवे । लोंबीनी भरतील बिघे ॥
अन्न आपणा भुमि देते देते । अन्न लागते परी तिला ।
राब जाळीता कसही जळतो । अन्न ना मिळे भुमिला ॥
शेत भाजणीं राब जळते । ना मंजूर ह्या रितीस ।
राब पाचोळा कुजवी गोमय । खत मिळवी हे भातास ॥

कापणी होता शेत नांगरी। सूर्य तापविल शेतास।
गादी वाफे करूनी फेरी। उत्तम जे बी भातास ॥
सुंदर शेतिक करण्या रीती। नवी जपानी अैक झणी।
नवी रीत ही अेक जपानी। शेतकऱ्यांची संजिवनी ॥

कवियत्री : सौ. **विमल घैसास**

★

# " गांवकींत आपल्या ठरल्यालं हाय "

कवि : **शि. दा. कुलकर्णी**

सगळीच सारखी आपन मानसं,
कंदीबी आतां भांडायचं न्हाय,
गांवकींत आपल्या ठरल्यालं हाय .... १

सरकारनं "सावकार-राकीस" मारला,
कर्जाची आतां भानगाड न्हाय,
सोन्याचं पीक आपन पिकवायचं हाय .... २

मजेमंदीबी ताडी न माडी,
उटल्या सुटल्या कोनी प्यायाची न्हाय,
घरावर माडी छकास चढवायची हाय .... ३

चोरी, चहाडी आनि शिंदळकी,
करुन, तमाशा दावायचा न्हाय,
गांवाच्या नांवाला जपायचं हाय .... ४

कामाचा डोंगर उचलायचा हाय आतां,
बसून कोनी खायाचं न्हाय,
पूर्वीचं वैभव पुना आनायचं हाय .... ५

भलेपनानं जिनं जगायचं,
वाइटपनाला जागा ठिवायची न्हाय,
मानुसकीनं जग उजळायचं हाय .... ६

★

## महारीण

[ विकास योजनेचें भारूड ]

जुहार मायबाप जुहार, जुहार हिंदुराव, विकास योजना माझें नांव,
समुद्रापलिकडे माझें गांव, बडे आहे कीं जी मायबाप ॥ १ ॥

युरोप अमेरिका येथें माझी वस्ती, लहान थोरांशीं माझी फार दोस्ती,
त्यांनीं मोडिली माझी मस्ती, हवा तसा वापर करून
कीं जी मायबाप ॥ २ ॥

आतां हिंदुस्तानी आलें थोडक्कीं, गांधी, नेहरूंची मी फार लाडकी,
भारताची परिस्थिति पाहून रोडकी, म्हणून मला इथें
आणलें कीं जी मायबाप ॥ ३ ॥

माझा महारणीचा अंगीकार करा, तरीच तुमचा बरा थारा,
नाहींतर पुन्हा पडेल फेरा, दीडशें वर्षासारखा कीं जी मायबाप ॥ ४ ॥

महारणीचे बोल ऐका, माझी जात दूर ठेवूं नका,
अस्पृश्य तुम्ही मानिता फुका, परि त्याविना गत नाहीं
कीं जी मायबाप ॥ ५ ॥

ग्राम सुधारणा माझी बहिण, तिला जपावें प्राणाहून,
ना तरी जाईल दूर पळून, मग बरा विचार नाहीं
कीं जी मायबाप ॥ ६ ॥

गांवचें आरोग्य राखावें, रस्ते दुरुस्त ठेवावें,
समाज-मंदिर बांधावें, म्हणजे रमेल इथें कीं जी मायबाप ॥ ७ ॥

अनुक्रमांक 23६53 दि. ...
क्रमांक ... नों: दि: ...

पाण्याची स्वच्छता ठेवा, जपानी पद्धत इथें आणवा,
हरप्रयत्नें धान्य पिकवा, तिला जें रुचेल तें करा जी मायबाप ॥ ८ ॥

साक्षरता माझी मैत्रीण, हिंदुस्तानी ती झाली असे दीन,
जर कां राखाल तिचा मान, तरीच कल्याण तुमचें
कीं जी मायबाप ॥ ९ ॥

तिचा संघ तुम्ही करा, गांवोगांवीं हेंच पुकारा,
तिच्यावांचून खरा आसरा, असा दुसरा नाहीं
कीं जी मायबाप ॥ १० ॥

आणिक सांगतें ऐका, राग नका धरू, भय वाटतें मला काय करूं,
माझी सवत दुष्ट भारी, नांव तिचें दारू, सदा छळितें
तुम्हाला कीं जी मायबाप ॥ ११ ॥

तिनें केली माझी भयंकर चोरी, माझें सखे हिंदुजन घातलें उरीं,
कायमचें करून ठेविलें भिकारी, असली ही घरीं नको
कीं जी मायबाप ॥ १२ ॥

जर का लागाल तिच्या नादीं, भ्रष्टेल तुमची सारी बुद्धी,
विसराल सख्यानो माझी शुद्धी, मग मी इथें मरेन
कीं जी मायबाप ॥ १३ ॥

जळो तिचें तोंड काळें करा, परदेशीं नेऊन तिला पुरा,
श्याम कवीचा हा इशारा, दाखला महारणीचा
कीं जी मायबाप ॥ १४ ॥

कवि—श्याम देशमुख
मु. पो. सोनवडे, ता. पाटण

★

## — कशी बनली मदिरा ! —

( चाल—देख तेरे संसारकी हालत )

ऐक सांगतो भल्या मानवा कशि बनली मदिरा !
भुलविला जिनं भारत सारा ! ! धृ०

सुरासुरांनी समुद्र मंथन—वरति काढली चौदा रत्नं
त्यांतच होती ही कैदाशिन—महा भयंकर ही चांडाळिण
दैत्यानी तिज आश्रय दिधला बनुन तियेचे दास
जाहला म्हणुन तयांचा ऱ्हास ! ! १

आग न् पाणी वैरी दोन्ही—यांचें अेकदां भांडण झालें
नारदमुनींच्या मध्यस्तीनें—ब्रह्मदेवापाशीं गेले
'महाभुतें हीं कोपतील जर, अनर्थ होइल खास !'
वाटलें असें ब्रह्मदेवास ! ! २

अेकी त्यांची करण्यासाठीं—नरकाला त्यांच्यांत मिसळला
अग्नी, पाणी, नरक मिळोनी मदिरेचा नव देह बनविला
पाण्यासम ती पातळ असुनी देहाला जाळी
घाण ती नरकासम आगळी ! ! ३

बाळ-कासेगांवकर ( बा. पां. वीर )

★

## " अजुनि जायचे पुढे— "

का उदास जाहलास भ्रांत का तुला पडे ।
मार्ग नाही संपला ध्येय राहिले पुढे ।
चाल भारता पुढे ।
अजुनी जायचे पुढे ॥ ध्रु० ॥

क्लेश घोर साहिले
कष्ट थोर वाहिले
बंधमुक्त पाहिले
हिंदी जन आपले
कार्य परि न संपले
बुजायाचेच राहीले
विदीर्ण हिंदच्या यशास पडलेले हे तडे।
रमु नकोस चल पुढे।
चाल भारता पुढे।
अजुनि जायचे पुढे॥ १॥

दाही दिशा हांसती
हासुनि तुज सुचविती
नांदणार भारती
समतेची न्यायनीति
चिरंजीव ही शांती
मानवता विश्वप्रीति
ह्याच मिषे आशेने जग बघे तुझ्याकडे।
चल उचल टाक पद पुढे।
चाल भारता पुढे।
अजुनि जायचे पुढे॥ २॥

सत्याग्रही योद्धा तू
शांत क्रांतिवीर तू
मनीचा तव शुद्ध हेतु
मग कशास हा किंतु
निश्चयास करूनि सेतु
लंघुनि जा भव-सिंधु

वल्हव वल्हव नाव तुझी त्या यशो ध्रुवाकडे ।
शिड तिरंगी फडफडे ।
चाल भारता पुढे ।
अजुनि जायचे पुढे ॥ ३ ॥

पंचवार्षिक योजना
पुरवील तव कामना
प्रसव नव्या कल्पना
कर नव संशोधना
योज नव्या साधना
देई तनु-मन-धना
संहारक अणुयुगास शिकव शांतीचे धडे ।
पाऊल तुझे का अडे ।
चाल भारता पुढे ।
अजुनि जायचे पुढे ॥ ४ ॥

अठ्ठेचाळीस कोटीचा
मंत्र तुला जपायचा
तीस कोटि शक्तीचा
भव्य पुरुष तू साचा
सामुहिक प्रगतीचा
मार्ग तू चालायचा
चल बांधवास देइ हांक फुटले रे तांबडे ।
खूप जायचे पुढे ।
चाल भारता पुढे ।
अजुनि जायचे पुढे ॥ ५ ॥

कवियत्रिः—सौ. पद्मा गोडबाले बी. ए.

★

# आमचें आदर्श खेडें

समूह–गीत

गांव आमुचें छान छान। नाहीं येथें मुळीही घाण ॥ धृ. प. ॥

सुखांत आम्ही शेजारी। नाहीं कोणी आजारी।
युगा युगांची घर रस्त्यांतिल। आम्ही काढली घाण घाण ॥ ध्रु. प. ॥

निरक्षरांना शिकवायाला। आम्ही काढली ही शाळा।
शिकवुनि त्यांना आम्ही केलें। ज्ञानाचें हें दान दान ॥ ध्रु. प. ॥

सूर्य उगवण्याच्या आंत। आम्ही जातो शेतांत।
घाम गाळुनि करितो आम्ही। शरीर श्रमांचें दान दान ॥ ध्रु. प. ॥

गरिबी आणि ती श्रीमंती। हातांत येथें हात घालती।
वैषम्याचें आमुच्या गांवी। नाहीं मुळी ही भान भान ॥ ध्रु. प. ॥

स्वातंत्र्याच्या गीतांनी। ऐश्वर्याच्या गीतांनी।
दुमदुमवीतो आम्ही आमुच्या। गावाचें हें रान रान ॥ ध्रु. प. ॥

धर्मांचे आणि जातीचे। नाहींत भेद भाषेचे।
विसरुनि भेदां गातो आम्ही। एकत्वाचें गान गान ॥ ध्रु. प. ॥

गांव आमुचें आम्हांस वाटे। अभिमानानें जरी हें मोठें।
देशापुढती नाहीं त्याचा। व्यर्थ असा अभिमान ॥ ध्रु. प. ॥

लेखकः—वि. त्र्यं. गर्दे एम्. ए.

★

# छत्रपतींना मुजरा

प्रतापगडच्या पहाडावरी पहा भव्य मूर्ति
छत्रपतींना मुजरा करूनी मिळवावी स्फूर्ति ॥ ध्रु० ॥

जाहलें दशक तें पूर्ण
स्वातंत्र्य सूर्य उगवोनी
तरि अजुनी झोंपती कोणी
आळशी करंटे प्राणी
त्यांना उठवून सांगा–" ऐका झडताती नौबती "— ॥ १ ॥

तोंडची वाफ दवडावी
हा असा नसे हो काळ
'कामाचे पर्वत' उचला
विजयश्री घालिल माळ
सस्यश्यामला भारतमाता खुलेल मग चित्तीं— ॥ २ ॥

आराम करावा त्यांनीं
ज्यांच्यांत नसे हो 'राम'
कष्टाचें जीवन प्यारे
श्रमदेव आमुचा राम
रामराज्य निर्माण होतसे होतां जन जागृति— ॥ ३ ॥

श्रमदान करोनी आतां
उचलावा अपुला वाटा
दारिद्र्य लपवुनी तोंड
मग पळेल चारी वाटां
सले न कांटा, फुलेंच फुलतीं, आनंदें डोलतीं— ॥ ४ ॥

" आगामी वैभव " त्याची
हीं विकास कार्यें खूण
योजना पांच वर्षांची
जनतेचें श्रद्धा स्थान
एक दिलानें उठुनी आपण करूं ध्येयपूर्ति— ॥ ५ ॥

खेड्यांत बांधणें शाळा
रस्त्यांचें पसरूं जाळें
विहिरी अन् बांधुनी धरणें
सोन्याचे पिकवूं मळे
' काळे करिते ' बेकारी अन् कष्टकरी नाचती— ॥ ६ ॥

दारुबंदीनें नवजीवन
घेतात प्रचीति कैक
व्यसनांचें वेड नसून
ध्यास आज लागे एक
कामकऱ्यांच्या कल्याणास्तव रामराज्य-निर्मिति— ॥ ७ ॥

आशेच्या आकांक्षेच्या
किरणांनीं उजळूं भारत
ध्येयावरि निष्ठा ठेवूं
स्फूर्तिलहरी उसळूं लागत
नवभारत निर्मून वाढवूं वडिलांची कीर्ति— ॥ ८ ॥

छत्रपतींना मुजरा करूनी मिळवावी स्फूर्ति ॥

कवियत्रीः—सौ. हेमलता वामन नाईक

★

# समाज विकास

॥ पद ॥ १ ॥

गत कालाच्या इतिहासाशीं, अवलोकन करून। झाला बदल पहा, कालगतीनें ऐका सर्वजण ॥ १ ॥ वरचेवर हा बदलत जातो, पहा युग-धर्म। धर्म, शास्त्र, व्रत शस्त्रही वदले, वदलें निशाण ॥ २ ॥ परशुराम तो निःक्षत्रीय करी, फरशु हातीं धरून। रामचंद्रप्रभु हातीं घेती, विजयीं धनुष्य बाण ॥ ३ ॥ श्रीकृष्णानें हातीं घेतलें, प्रबळ सुदर्शन। अशोक राजा शस्त्रास्त्रांचा, त्याग करी पूर्ण ॥ ४ ॥ ऋषी मुनी हे धर्म शिकविती, यज्ञयाग करून। गुरुगृहीं त्या जाऊनि विद्या, करिती ग्रहण ॥ ५ ॥ छत्रपतींच्या काळीं बंदुकी, तरवारी जाण ॥ भाले जंबिया बर्चे तोफा, झडती खणखण ॥ ६ ॥ पोशाख त्यांचा लांब झगा आणि, चोळणा नेसुन। शिरीं घालुनी पगडी, करिती मुजरा मानानं ॥ ७ ॥ रामदास गुरु त्यांनीं दिधलें, विजयीं निशाण। धर्मरक्षक भगवा झेंडा, वंदनीय पूर्ण ॥ ८ ॥ मेणे पालख्या, हत्तीघोडे रथ, सवारीशीं वहान। शिंगें हालग्या कर्णे ईशारा, देती गर्जुन ॥ ९ ॥ ब्रिटीशकाळीं, बंदुक पिस्तुल, तोफा मिशन गन। टारपेडो हावाई जहाज माइन्स घेती पुरुष ॥१०॥ एंटीटँका रणगाडे आगबोटी, मोटार स्टॅक्टरन। सैन्य पोंचवी, बातमीसीं तो असे टेलिफोन ॥ ११ ॥ प्याराशूटनें धान्य पोंचवी, उतरतसे सैन्य। समुद्राचे तळांत उडवी टारपेडो जाण ॥ १२ ॥ ऐटम्बॉम्ब अणुबॉम्ब काढिले, संहारकपूर्ण। रशियानें तो चंद्र सोडिला फिरे गगनांतून ॥ १३ ॥ पोशाख त्यांचा युनिफार्म हा कंबर बांधुन। वैज्ञांनींहीं वाहनें फिरती, आकाश पाणी जमिन ॥ १४ ॥ निशाण त्यांचे युनियन जॅक त्यास देती मान। एक धर्म मानुनी, देती देशांसाठीं प्राण ॥ १५ ॥ काढी भारत मूलतत्त्व हें, शस्त्र शांति जाण। सत्य शांति आणि अहिंसा, चिरंजीव पूर्ण ॥ १६ ॥

स्वराज्य कमवुनी विजयी झाले, जगतीं दावि अचंबा । भगवा झेंडा जे ब्रिटिश उतरीते, चढवी तिरंगा ।। वैज्ञानानें ओळख सुटली, सुटले नीतीधर्म । काढी महात्माजी मुलतत्त्वीं हें आचराया कर्म ।। १८ ।। बूट पाटलोन शर्ट टोपी डोईसीं छान । झाला अतिरेक मिशा काढुनी, भांग फिरवुन ।। १९ ।। विकास योजना पाणी पुरविते तलाव बांधुन । भिजवुनी जमिनी अधिक धान्यां पिकवा आनंदानं ।। पाण्यावरती वीज बनविती प्रकाशित पूर्ण । पक्के रोड आणि वेडींग जनते कारण ।। २१ ।। राजा शेतकरी तुला बनविलें राज्य करी जपुन । सहकार्यानें शेती करूनी सुखी करी जीवन ।। २२ ।। अंबर चरखा देई सरकार सुत काता म्हणुन । खादि घालुनि व्हा, अन्न वस्त्रानें स्वावलंबन ।। २३ ।। दारू सोडा दूध पिवुनी व्हावें बलवान । पूर्वीं पासूनी भारत चमके, निःसर्ग भूषण ।। २४ ।। पंचवार्षिक दुसरी योजना, पुढें चाले जाण । जनते करी त्यां साह्य बनवी, भारत सूवर्ण ।। २५ ।। नवा काळ हा वाहे सदोदित, विचार याचा करून । योग्य आणि लायक नेता, द्यावा निवडुन ।। २६ ।। तनय रावजी करितो विनंती, हात जोडुन । भेद भाव सोडुनी वीरता, टिकवा एकीनं ।। २७ ।।

कवि—रावजी तनय

★

# हाकरे जोडी

हाकरे जोडी जोमांत जोरांत—
हाकरे जोडी हाक ।। ध्रु० ।।
उन्हाळ्याच्या दिवसांत खत टाकूं शेतांत
काम करूं जोरांत डाली हाकूं झोकांत
हाकरे डाली जोराच्या भरांत हाकरे डाली हाक ।। १ ।।

हंगामाची वखत आली रे, मृगाची छाया पडली रे
कामाची रेलचेल झाली रे, पावसाची सर आली रे
हाकरे जोडी पावसाच्या रेघांत हाकरे जोडी हाक ॥ २ ॥
झाली वखरणी शेताची, जपानी पद्धत करण्याची
पेरणी झाली धानाची, वेळ आली निंदण्याची
हाकरे जोडी निंदण्याच्या शेतांत हाकरे जोडी हाक ॥ ३ ॥
जपानी पद्धत केल्यानं, पीक आलं दुपटीनं
औत हाकतो डौलानं हर्षित झाला किसान
हाकरे जोडी हर्षांच्या भरांत हांकरे जोडी हांक ॥ ४ ॥
नाचत दिवाळी आली रे धानाची मळणी झाली रे
कठाणाची फसल आली रे किसान तिकडे धावला रे
हाकरे जोड्या धावण्याच्या जोरांत हाकरे जोडी हाक ॥ ५ ॥
काठाणी माल पिकलारे साऱ्यांचा चुरना केलारे
सर्वांना धान्य देईल रे आनंद किसाना होईल रे
हाकरे जोडी खुषीच्या भरांत हाकरे जोडी हाक ॥ ६ ॥

लहरी टिकाराम

★

# ज्ञान मंदीरी चला

कविः—पांडुरंग गोविंद माने

यारे यारे मिळून साऱ्या प्रौढांनो
'जीवन शिक्षण मंदिरी' जाऊ चला ॥ ध्रु० ॥
दिवसा गाळून घाम
सारं उरकूनि काम
पाणपोई गड्या येथं क्षणभरी थांब
पिऊन अमृत जिवंत होऊ चला ॥ १ ॥

महात्मा ज्योती फुले
हेच सांगून गेले
गांधी बाबानी जिवाचे रान केलें
दुवा त्यांचाच अज्ञानी जनतेला ॥ २ ॥

सारी दुनिया आगे
आपण राहिलो मागे
दु:ख याचं मनाला आमच्या लागे
नाहीं भिऊन भागायचं काळोखालों ॥ ३ ॥

ज्ञान ज्योतीमुळें
भिऊनी अज्ञान पळे
राज्य तुमच्या हाती कां रहाता खुळे
मार्ग भाग्याचा जाऊनि पाहू चला ॥

★

## दारुबंदी योजनेसाठीं—

( गीतस्पर्धेकरितां )

दारु पिऊन वायां गेलं धनी
ऐका जन्माची माझ्या हो कहाणी।
ऐका कर्माची माझ्या हो कहाणी।
दारु पिऊन वायां गेलं धनी हो दारु पिऊन वायां गेलं धनी ॥ धृ० ॥

घर नांदत जणूं गोकुळ
सुख समृद्धिनं भरलेलं
पोराबाळांनीं आनंदलं
आज झालंया स्वप्नावाणी हो दारु पिऊन वायां गेलं धनी ॥ १ ॥

कुठून कशी आली वावटळ
व्यसनांनी यांना घेरलं
बाटलाबाईचं लागलं खूळ
झाली संसाराची धूळधाणी हो दारु पिऊन वायां गेलं धनी ॥ २ ॥

शेत सावकारी लुटून नेलं
गाई बैलही गोठ्यांतलं
पोराबाळांचें होत्याती हाल
मला दिसताती बापूडवाणी हो दारु पिऊन वायां गेलं धनी ॥ ३ ॥

गेली लक्षुमी रागावून
अवदसेन मांडिलं ठाणं
वस्त्रापात्रांची झाली चणचण
अर्ध्यापोटी दीस काढून हो दारु पिऊन वायां गेलं धनी ॥ ४ ॥

झाली अशी घराची दैना
सहन होईना माझ्या मना
धनी व्यसन सोडून देइना
कुठवरी करुं मनधरणी हो दारु पिऊन वायां गेलं धनी ॥ ५ ॥

पोर तापानं बेजार झालं
अपरात्री धनी घरि आलं
नशेमधें तया मारिलं
ते सोडून गेलं ही धरणी हो दारु पिऊन वायां गेलं धनी ॥ ६ ॥

अन्नपायी जीव उबगला
सांगते आयाबहिणीला
पोर तापांत माझा गेला
व्यसनाची विपरीत करणी हो दारु पिऊन वायां गेलं धनी ॥ ७ ॥

सौ. राधाबाई जोगळेकर

★

# ' पंचवार्षिकां ' धरूं या हातीं

देशामधली हसेल माती
नवआशांचे झुलतिल मोती विरून जातील साऱ्या खंती १

परवशतेच्या सीमा साऱ्या
आज लंघुनी पुढें जायचे
पिचलेल्यांच्या मनिषा अधुऱ्या
पुरवित, नटवित जगावयाचे
हेच पताकास्थान आपुलें; ' पंचवार्षिकां ' धरुं या हातीं ! २

साक्षरतेचे पयूष निर्मळ
आज शिंपणें खेडोपाडी
सान-थोर ही सारी जळजळ
जाळित जाइल अपुली गाडी
दारिद्र्याची खचेल कंबर मिळेल त्यालाही मुठमाती ! ३

वाट पाहणें पुरें जाहलें
डोळे शिणले, पण ये संधी
विसरा सारें झालें-गेलें
करा देशभर दारुबंदी
डोळ्यामधला दाह जळो या सळसळ करूं द्या अवघी शेती ! ७

घाण उपसणें आज ठरविलें
सहकार्यानें ग्रामोद्धार
समाजशिक्षण ब्रीद घेतलें
अमुचा आम्हीं उचलीत भार
झुंजाराचे बच्चे आपण लढता लढता नटवूं धरती ! ४

अहंपणाला फाटा देणें
ग्रामोद्योगा विकसित करणें
आपुलकीचा भाव निर्मिणें
चरखा घेऊन सूत कातणें
स्मरण करोनी ह्या मंत्राचे अतूट नांदवूं केवळ प्रीती ! ५

शेतामधलें अमुचे जीवन
व्रणाघातहि झेलिल लिलया
नाजुक कणखर झालेलें मन
करित योजना घडविल किमया
जगासारखें आपण होऊं मिटवित जाती बांधत नातीं
हंसेल माती झुलतिल मोती ' पंचवार्षिकां ' धरुं या हातीं ! ! ६

★

## निरक्षर प्रौढांसाठीं

( चाल—जगाला प्रेम अर्पावें )

उठा रे ज्ञान घेण्याला
भितां कां लोकलाजेला ॥ धृ० ॥

असूनी दोन्हिही डोळे
परंतू आंधळे सगळे
मीळवा ज्ञान नेत्राला ॥ १ ॥

बदलत्या पाहुनी जगतां
जाणुनी बोध घ्या आतां
झुंजण्या पुढिल काळाला ॥ २ ॥

आपुलें पत्रही येतां
मजकुरा वाचण्याकरितां
फुकाचा मान दुसऱ्याला ।। ३ ।।

कचेरी कोरटामाजीं
जिवाची होतसे भाजी
टाळण्या हाजिहाजीला ।। ४ ।।

फसविती नित्य व्यापारी
मारिती हात मापारी
दलाली नष्ट करण्याला ।। ५ ।।

देईना कोणिही मान
होतसे सतत अपमान
म्हणूनी जाउं शाळेला ।। ६ ।।

चि. न. सोनवणे.

★

# डफावर थाप—

टाकण्यापूर्वीं मला हें सांगितलें पाहिजे कीं, हा दारूचा पोवाडा मी "गौतम कला पथक" या लोकनाट्य संस्थेसाठीं लिहिला. शाहीर ग. तु. लिगोड यांच्या पहाडी आवाजावर भाळून मी याची रचना केली. हेतु हा कीं, माझा हा दारूचा पोवाडा बहुजन समाजास पहाडी आवाजांत सांगावा व थोडेसेंतरी लोक सेवेचें कार्य माझ्या हातून व्हावें, व सरकारच्या दारूबंदीच्या ध्येय धोरणांस सहमत व्हावें म्हणून मुद्दाम लिहिला.

जानती शाहीरी मंडळीं हा पोवाडा गातांना आपल्या ओजस्वी आणि तडफदार वाणीचा उपयोग करतीलच पण नवीन आणि हौशीं शाहीरांच्या-साठीं, नवीन शिकावूं तरूण मंडळींच्यासाठीं प्रत्येक कडव्याच्या शिरांवर मी चाली नमूद केल्या व त्या खालीं शक्य तितक्या सोप्या भाषेंत दारूबद्दल "बयाण" करतां यावें व दारूचा पोवाडा परिणामीं सांगतां यावा यासाठीं मी भाषणाची जोड दिली आहे. भाषा सोपी व सहज समजेल अशी वापरलेली आहे. तरी माझा हा प्रयत्न व सेवा जनताजनार्दन गोड माणून घेईल हीच आशा.

सर्वांचा कृपाभिलाषि
**ह. आ. सरनाईक**

# दारूचा पोवाडा

लेखक

ह. आ. सरनाईक, कोल्हापूर

( चालः—शाहीर )

जन लोक ऐका ही कथा। सावधान चिता।
ठेवूनि अवधान ॥
दारूचा गातो पोवाडा। करा निवाडा। श्रोत्यावंदन
केलें अल्प मतीं हे कवन। तुम्हां अर्पण वंदूनि चरण ॥ जी ॥

शाहीरः—मित्र हो! आज आपल्या पुढें मी, दारूचा पोवाडा गाऊन दाखविणार आहे; दारू प्यावी किंवा नको–त्याबद्दल माझें विचार आपल्या समोर मांडणार आहे. आपण हा दारूबाजाचा पोवाडा शांत पणानं ऐकून, दारू प्यावी किंवा नको हें स्वतः आपणच ठरवा ! !

## पोवाडा

( चालः—शाहीरी )

ऐका दारू बाजाची पत। सावध ठेऊन चित्त।
दारूनें कोण जगीं तरला। दारू पान घात आयुष्याला ॥
ऐका या दारूचा हो घाला ॥ १ ॥ जी जी० ॥

दारू कारण असें नाशाला। धोका जिवीताला।
दारूचा मोह ज्यानें धरला। व्यवहारी जिताच तो मेला।
कुळाचा नाश त्यानें केला ॥ २ ॥ जी जी० ॥

लाऊं नका ग्लास तोंडाला। दारूचा हा पेला।
आवडीनें ज्यानें हाती धरला। आग त्यानें लावली कुटुंबाला।
दारूच्या ऐका महात्म्याला ॥ ३ ॥ जी जी० ॥

**शाहीरः**—दारूं प्यावी किंवा नको या बद्दल माझें विचार या पोवाड्यांत मी आपणासमोर मांडणार आहे, हीं दारूं प्रथम पासून कसा घात करतें हें आपणांस सांगणार आहे.

( **कटावः**—झडीची चाल )

**दारू बाज कर्ज बाजारी ।**
**नाहीं देत कोण उधारी ।**
**किंमत नसे पत व्यवहारी ।**
**दारूनें शून्य दिशा चारी ।**
**लायकी दारूबाज जगीं मुकला हो ।**
**पुढें ऐकावा दारूचा घाला ॥**

**शाहीरः**—अशा तऱ्हेनं प्रथम पासून दारूबाज व्यवहारांतील पत गमावतो, पण व्यसन वाढत जाऊन पुढें परिणाम काय होतो.

( **चालः**—गिलच्याची )

**दारू पिणारा पहिला मुकतो आपल्या नितीला ।**
**फाटा देऊं लागे मग तो दुसरा धर्माला ॥**
**नंतर बसतो हळूं हळूं मग मनावरती टोला ।**
**अखेर लागे झीज दारूनें आपल्या देहाला ॥**

**शाहीरः**—एकदां कां दारू प्यायला सुरवात झालीं कीं, या क्रिया घडायला सुरवात होते. दारूमुळं पहिला तडाखा नितिवर बसतो. दुसरा तडाखा धर्मावर, तिसरा मनांवर, मन ताब्यांत रहात नाहीं. आणि चौथा स्वतःच्या देहावर! आणि हें सर्व जरी घडत असतें, तरी दारूं पिणाऱ्याचें व्यसन कमी न होता ऊलट अधिक वाढतच असतें! पहिल्यादां माणूस दारूला पितो, पण पुढें पुढें दारूच माणसाला पिवून टाकते! अशा कारणामुळें त्या दारू पिणाऱ्याचा तोल सुटत जातो. त्याला दाहिं दिशामध्यें शून्यता आलेली असते. मन बैचेन झालेलं असतं! आणि त्या मनाला शांत करणेंसाठीं

दारू शिवाय जगात प्रिय अशीं कोणतीच गोष्ट त्याला दिसत नाहीं. त्यामुळें दारूबाज नाते–गोते हें सर्व विसरून जातो. आणि मग ?

( **चालः**—काळया बाजाराचा रोग आला. )

**नातें विसरें दारूच्या पाई ।**
**आई, ताई, भाई ।**
**स्वतःच्या विसरूनि पुत्राला ।**
**पोरके करतो संततीला ।**
**दारूचा ऐका पुढें घाला ॥**

**शाहीरः**—अशा तऱ्हेनं नातें विसरतों. आई, बाप, बहिण, भाऊ, बायको, मुलं हीं कोण त्याला दिसत नाहींत. त्या सर्वांची जबाबदारीं स्वतः कुटुंब प्रमुख कुटुंबांतील एक कर्ता म्हणून जीं कांहीं जबाबदारीं असतें ती, तो दारूबाज, दारूंमुळं विसरून गेलेला असतो. या सर्वांची काळजी न करतां, तो फक्त दारूचीच सदासर्वकाळ काळजी करीत असतो. जर कदाचित घरांत आई, वडील म्हातारे असले, तर वृद्धापकाळांतील पुत्र या नात्यानें स्वतःवर जी जबाबदारी असते, ती तो या दारूमुळं विसरून जातो. व त्यांचे हाल सुरूं होतात. आणि जर त्याच्या घरांत लग्नाला आलेली एकादी पाठची बहिण असेल, तर अगोदरच या अतिदुष्ट हुंडा पद्धतिनं व तशांत भाऊ दारूबाज बनल्यामुळं त्या सख्या एकाच मातेच्या पोटातून पाठीस पाठ मारून आलेल्या ऐन तारुण्यांत, लग्नाच्या वयांत आलेल्या बहिणीकडे हा दुष्ट दारूबाज ढुंकूनहि पहाण्यास तयार नसतो. मग काय स्थिती होत असेल त्या तरूण मनाची ? तसेंच त्याच्या पोटीं एकादं मुलगा किंवा मुलगी असेल, तर त्यांच्या पालन–पोषणाकडे आणि शिक्षणाकडे दुर्लक्ष होतें. स्वतःच्या पत्नीची तर दुर्दशा कोणत्या प्रकारें होते याची उदाहरणें, आपणांस सर्वांस

मराठी

व्यवहारांत रोज पहावयास मिळतातच! आणि हें सर्व एका दारूमुळं होतं! दारूबाज आपलं स्वतःचं कुटुंब अशा तऱ्हेनं देशोधडीस लावतोच! पण येवढं करूनहि तो थांबतो, असें नाहीं, तर, तो पाप मार्गांकडे झुकतो.

( चालः—कटाव-झडीची )

दारूड्या पाप पुण्य दोन्हीं।
स्वर्ग नरक समान तो मानी।
नच आवडे पवित्र वाणी।
दारूचे ईष्कबाज लावणी।
गोंजारी वेशा रांडेला हो। पुढें ऐकावा दारूचा घाला॥

शाहीरः—अशा प्रकारें दारूबाज हा माणसांतून उठतो, संसारांतून उठतो, नीतिला, धर्माला फाटा देतो, स्वर्ग, नरक, याची भीति त्याच्या मनांत रहात नाहीं. आणि दारूबाज वेशा गमन करूं लागतो. त्यांस रसाळ, पवित्र, अभंग वाणी कधींहि ऐकवत नाहीं तर त्याच्या कानांस अश्लील, बिभित्स, पांचटविषयीं, लावण्या गोड वाटून तो वेशा गमन करूं लागतो. व त्यांस व्यभिचारीनीची संगत आवडते, देवा-ब्राह्मणासमक्ष, अग्नी-नारायणास साक्ष ठेवून, जन्माची जोडी-दारीन म्हणून जिचा हात पंचासमक्ष हातांत धरला, त्या गृहलक्ष्मीस हा लाथाडतो. व्यभिचारीनी, कीं, जी स्त्री आपल्या पतिला फसवून पर पुरूषाशीं रत होते, नागिनी प्रमाणं, फुंस, फुंस, करून घरांतील काम धंदा टाकून पर पुरुषाकडे पहात रहाते, नवरा, सासरा, सासू, दीर, जावा-नणंदा हें सर्वजण झोपी गेलीं असतां परपुरुषाकडे जाणारी व परपुरूषास पाहून आपलें कुरळे केस मोकळें सोडून स्वतःच्या स्तनांकडे वेळोवेळीं पहाणारीं, परपुरूषांस पाहून चावटपणें बोलणारी, डोळा घालणारीः भुवंया उडवणारी डोळें गरगर फिरविणारी, जन्मांध असो, कुरूप असो, म्हातारा असो, कुष्ट रोगी असो, कसाहि असो, थोडासा पैसा दिला

असतां आपला देह त्याच्या स्वाधीन खुशाल करतात, त्या व्यभिचारीनीची संगत या दारूबाजास आवडूं लागते. व्यभिचारीनी, रूपीं, अग्नी, सौंदर्यरूपी लाकडांनीं, पेटलेल्या खाईंत हे दारूबाज मुर्ख खुशाल उडी घेतात! व स्वतःला जाळून घेतात! वेशा, कीं, जिचें ओठ, म्हणजे दिसण्यांत रम्य पण रोगी, आंधळा, पांगळा, चोर-साव, अठरा पगड जातीनं थुंकण्याचें थुंकी पात्रच जणूं! परटाचा धोंडा, जसा कोणत्याहि आणि कसल्याहि कपड्याचा मार सहन करतो, किंवा सार्वजनिक मुत्रीमध्यें जसा कोणीहि, केंव्हांहि आणि कधींहि लघवी करूं शकतो, अशा या वेशाबाईचा संग त्या दारूबाजास गोड वाटूं लागतो. कुत्र्याला पीठ दाखवतांच तें जसें पाठोपाठ पळत येते, तसें थोडासा पैसा दिला असतां कुणालाहि आपला देह खुशाल देतात, अशा वेशा, व्यभिचारीनीची संगत दारूबाजास, दारूमुळं बरी वाटूं लागते! म्हणून दारूचा ग्लास बंधूनों! कधींहि तोंडास लावूं नका! या दुष्ट दारूचा ग्लास तोंडाला लावतांच काय काय क्रिया घडते, ऐका!

( **चालः**—जगताचा तो त्राता उपाशीं )

**दारू पिणारा ग्लास पहिला लावितो अधरा ।**
**अंगावरती कांटा त्याच्या येतो सरसरा ॥**
**कंठ भाजतो, तोंड वांकडे, जीभहि चरचरा ।**
**रक्त जळूनि, नजर कमी ये अपाय तो जठरा ॥**

**शाहीरः**—दारूचा पहिला ग्लास तोंडाला लावतांच पिणाऱ्याच्या अंगावर त्या वासामुळं सरसर कांटा येतो. त्याचें नरडें, जीभ चरचर भाजून निघते, तरी पण तो तोंड वांकडे करून व्यसनी दारूबाज दारू पितोच! पण ही दारू पोटांत जावून गप बसत नाहीं, तर उष्णतेमुळें रक्त जाळूं लागतें, आणि मग जठराग्नीस त्रास सुरूं होतो. या सर्व घटनेमुळें दारूबाजाच्या बुद्धीवर, मनांवर,

डोळयावर आणि शरिरांवर परिणाम होतों. म्हणून बंधूनो! या दुष्ट दारूला स्पर्श न करण्याची प्रतिज्ञा करा !

( चालः—झडीची )

या दुष्ट दारूच्या पाई हो ऐका।
जिता मरतो नर।
रडति बायका पोरं।
जो करील दारू व्यसनाला ॥ जी० ॥

धरू नका हाती दारूला हो ऐका ।
काळ बायका मुला।
रडति गाई अबला।
द्या फेकूनि हो या दारूला ॥ जी० ॥

**शाहीरः**—म्हणून अशा प्रकारें सर्वस्वाचा घात करणाऱ्या त्या दारूला कधींहि स्पर्श करूं नका! बंधूनों! आपल्या शास्त्रांत सुद्धां दारू पिणं पाप मानलेलं आहे. आपल्या धर्मशास्त्रांत चार प्रकारचीं पापें सांगितलेलीं आहेत. पहिलं पाप कोणतं ऐका!

( चालः—काळ्या बाजाराचा रोग आला )

चार पापें असती शास्त्राला। ऐका समयाला
ब्राह्मण हत्त्या, नरक तो वास ।
दुजें तें चोरीच्या कामांस।
तिसरें गुरू भार्या गमनास ।
चवथें तें असें सुरापानास ॥ जी ॥

**शाहीरः**—माझ्या बंधूनों ! सुरा, सोम रस, मदिरा, हीं सर्व गोंडस नांवें या दारूचीच आहेत, सोम रस पिवून प्रत्यक्ष ब्रह्मदेव आपल्या मुलीशीं संभोग करण्यास तयार झाला. शंकर हिच्या नादांत-आपल्या पत्नीस-गिरजेस सोडून अरण्यांत गेला. भगवान विष्णू

क्रमांक ........ नों: दि:

सोमरस पिवूनच क्षिरसागरांत झोपला. शुक्राचार्यांच्या पोटांत दारू मुळं शत्रूला शिरतां आलं. वृक्षपर्वा, आणि इंद्र याच्यांत भयंकर युद्ध दारू मुळंच झालं! अशीं हीं महाभयंकर दारू आहे. म्हणून शास्त्र वचनांस आपल्या पवित्र संस्कृति पाळण्यासाठीं तरी दारूला स्पर्श करूं नका! कारण........

( **चालः**—गिलच्याची )

**दारू बंदीची आज्ञा लिहिली असे हो शास्त्राला ।**
**तरी बंधूनों लावूं नका हा ग्लास तोंडाला ।**

( **चालः**—शाहीरी )

**ऐका दारूबाजाची पत । सावध ठेवून चित्त ।**
**दारूनें कोण जगी तरला । दारूपान घात आयुष्याला**
**ऐका पुढें दारूचा हो घाला ॥ जी जी ॥**

**शाहीरः**—आमच्या ऐकण्यांत असं आलं आहे कीं, दारूमुळं बुद्धी वाढते, बुद्धीची कामें होतात, धाडसाची कामें होतात, सुख मिळतें. पण ह्या युक्तिवाद फक्त दारूबाजच करतात. जें असा सवाल करतात त्यांना आमचा असा सवाल आहे कीं, बुद्धी वाढायला बुद्धीही मुळांत असली तरी पाहिजे? अगर धाडस वाढायला मुळचं अंगांत धाडस असलं तरी पाहिजे? मग सांगा! बुद्धी असणारा कोणीहि दारूनं बुद्धी वाढते असें म्हणेल कां? समजा! बुद्धी वाढते म्हटल्यास जर एकाद्या शतमुर्खांस, एकाद्या रेड्यास, एकाद्या माकडास, जर दारू पाजली तर त्यांस बुद्धी येईल कां? त्यांच्या हातून बुद्धीची कामं होतील कां? दारूनं अंगी धाडस येतं असं जर म्हटलं, तर एकाद्यां शेंदाड-शिपायास, एकाद्या हिजड्यास दारूपासून किती धाडस येईल? तो कोणता किल्ला सर करील? तो कुठें तलवार गाजविल? बुद्धीला आणि धाडसाला दारूची मुळींच जरूरी नाहीं! बुद्धी आणि धाडस हें मुळांतच असावें लागतात. आणि मुळांतच ही

दोन्हीं असणाऱ्यांस दारू प्याल्यांवर बुद्धीवान आणि धाडसी, शूर कोण म्हणेल ? पण ही तरफदारी फक्त दारूबाजच करतात ! मनुष्य दारूबाज बनला म्हणजे त्यांस खाण्यांस काय काय आवडतं.

( चाल :—कटाव )

मांस लागे दारूड्याला ।
गोड नाहीं भाजीपाला ।
चव नसे त्याच्या जीभेला ।
रूचिसाठीं गरम मसाला ।
मसाल्यानंतर मरतो तो पहिला । पुढें ऐकावा दारूचा घाला ॥

**शाहीरः**—मित्र हो ! मनुष्य एकदां दारूबाज बनल्यानंतर त्यांस खाण्यांस मांस लागतें, भाजीपाला, दुधदुभतें, त्यांस गोड लागत नाहीं. त्याच्या जिभेची दारूमुळं रूचि संपलेली असतें, म्हणून त्यांस मांस लागतें व रूचि येण्यासाठीं म्हणून गरम मसाल्यासारखे पदार्थ वापरावे लागतात. मसाल्यामुळें जठराग्नीस अधिकच त्रास होऊन आजार होतो, व तो वाढूं लागतो. मांस आणि मसाला, या दोहोंच्या सेवनानें क्रोध निर्माण होतो, वृत्ति तामशी होते, आणि त्यांत जर दारू या अग्नीची पडली तर दारूबाज मनुष्य अधिकच क्रुर बनतो.

( चालः—कटाव )

दारू वश असे हो क्रोदा ।
तिला रुचत नाहीं हो बोधा ।
मना जडे पक्की हो बाधा ।
सावधान असा बरं; दादा ! ।
जर लावाल ग्लास तोंडाला हो, । पडेल आकाशीं दारूचा घाला ! !

**शाहीरः**—दारूच्या थेंबालाहि स्पर्श करूं नका ! जर या दारूचा माणसास एकदां लळा लागला, तर काय होतं ? ऐका !

( चालः—कटाव )

दारूचा लागे ज्यांस लळा ।
तो विकेल लाखाचा मळा ।
हाती येईल करटी, भोपळा ।
म्हणून सोडा दारूचा लळा ।
उठतो माणसांतून दारूवाला हो । पडतो त्यांवर दारूचा घाला ॥

शाहीः—अहो, जर दारू प्यायला एकदां सुरवात केली, आणि, पुढें जर त्यांस दारू मिळालीं नाहीं, तर त्या दारूबाजाची स्थिती काय होतें, ठाऊक आहे ?

ऐका ॥

( चालः—कटाव )

दारू विना मन तळमळे ।
तनू गळे मन खळबळे ।
जीव जळे मन वळवळे ।
लक्ष उडे शून्य सगळे ।
नका जाऊं पशू कोटीला हो । चुकवा हिम्मतीनं दारूचा घाला ॥

शाहीरः—माझ्या बंधूनों ! इतका महाभयंकर परिणाम करणारीं दारू आपण कां प्यावी ? तीं जर नाहींच प्याली तर काय होईल ? दारू ही व्यक्तिचा नाश करते. व्यक्तिच्या संसाराचा, मुलां-माणसांचा, संपत्तिचा, चारित्र्याचा, माणूसकीचा घात करते. ती दारू कधींहि पिवूं नका ! व्यक्तिचा घात झाल्यामुळं कुटुंबाचा घात होतो, कुटुंबाचा घात झाल्यामुळं गल्लीचा घात होतो, गल्लीचा घात झाल्यामुळं समाजाचा घात होतो, आणि समाजाचा घात झाल्यामुळं दारूही देश घातक ठरते. म्हणून ही दारू कधींहि पिवूं नका !

( चालः—कटाव )

दारू नसतां काय हो नडे ।
दारू नसतां काय हो अडे ।
हरि–आंस बोल रोकडे ।
गाई पोवाडा शाहीर लिगाडे ।

जो ऐकून सावध झाला हो, । त्यांस चुकेल दारूचा घाला ॥
या दारूनें कोण जगीं तरला हो । हा ऐकावा दारूचा घाला ॥
जन लोक ऐका ही कथा । सावधान चित्ता । ठेवूनि अवधान ॥
दारूचा गातो पोवाडा । करा निवाडा । श्रोत्यावंदन
केलें अल्प मनिं हे कवन । तुम्हां अर्पण वंदूनि चरण ॥ जी० ॥

★

# ग्रामराज्याचा पोवाडा

कविः—म. ना. नानिवडेकर

चौक १ ला.

लोकशाहिचा फिरता शाहिर आला दारावर ।
ग्रामराज्याचा ऐका पोवाडा सरा सरा म्होरं ॥ धृपद ॥
स्वातंत्र्यामधिं दरेक खेडंगांव व्हावं नमुनेदार ।
चावडीमधला कारभार जसा काय दिल्लिचा दरबार ॥ १ ॥
आदर्श गांवच्या खुणा सांगतो टिपुन ठेवा सारं ।
सत्य सांगतो स्वानुभवाचं एकेक अक्षर ॥ २ ॥
खरं सांगाया बंदि नसावी कुठंहि जगावर ।
चुकी भूलीला माफी असावी करतों नमस्कार ॥ ३ ॥
गांवचे राजे तुम्हि आसनिं बैसला पंच परमेश्वर ।
न्याय नीतीनं राज्य हांकारा करतो नमस्कार ॥ ४ ॥

चौक २ रा.

तुम्हीच राजे तुम्हीच मायबाप तुम्हीच सरकार।
तुम्हीच तारणार तुम्हीच मारणार जन्मही देणार॥ ५॥

जन्माचि नोंद तुम्हि करतां।
मृत्यूचं टिप्पण ठेवीतां।
लोकसंख्या तुम्हिच मोजितां।

सांगा तुमच्या गावामंदि कोण कोण बेकार।
अर्ध उपाशी दिवस कंठिती करून रोजगार॥

नाहिं पेटली कुणाची चूल।
कोण उपाशी काढिती हाल।
हुडकून कसे काढाल।

सरपंच तुम्हि फेरी मारा समद्या गांवभर।
ज्याचें घरावर धूर दिसेना ओळखा तें घर॥

गरिबांची संख्या मोजा।
आणि त्यांच्या पुरवा गरजा।
सोसायटी स्थापा काजा।

गांवांतला पैसा गांवांत जमवा गांवकऱ्यांसाठी।
अपुल्या गांवची स्थापा झडकरी सहकारी सोसायटी॥

जमा होईल पैका सहज।
धनिकांना मिळेल व्याज।
गरिबांचं होइल काज।
गरजूंना मिळेल कर्ज।

आठवड्याचा परक्या गांवाचा पुरे आतां बाजार।
सोसायटीचं दुकान चालवा खासा व्यवहार॥

चौक ३ रा.

एक एक खेडंगांव सुधरुन गेलं दणक्यानं म्होरं ।
चावडीवरती आदर्श त्यांची ढाल फडकणार ।।

सर्वांगांनी विकास नेला त्यांनी आघाडीला ।
त्या खेड्यांचा जिल्ह्यावरती झाला बोलबाला ।।

विद्यामंदिर शाळा बांधिली तुमच्याबी गांवाला ।
नविन इमारत शोभा वाढली खरं किं नाहिं बोला ॥

शाळा बांधली सामान मिळालं आले मास्तर ।
एवढ्यानंच काय तुमची शाळा आदर्श बनणार ।।

पहिली घंटा ठंठं झडली प्रार्थनेच्यासाठीं ।
पोरं साऱ्या गांवभर कुणि कुणि ढोरांच्या पाठीं ।।

गुरुजीला दोष कां देतां ।
छडी नाहीं त्याचे हातां ।
कशि शिस्त लागावी म्हणतां ।
जर गुरुजी करडा दिसतां ।
बदलीची धमकी त्या देतां ।

कडक शिस्त आणि धाक दरारा नाहीं पोरांना ।
गुरुजी देखत पोरंपोरी घालीती धिंगाणा ।।

पटावरी तीनशें पोरं ।
प्रार्थनेस निम्मिच हजर ।
तरि चाले ठीक व्यवहार ।
ना तिकडे कुणाची नजर ।

म्हणाल गुरूजी काम शाळेचं करतील बरोबर !
आईबाप कामांत गुरूजी वर्गांत पोरं गांवभर ।।

गांवकऱ्यांच्या सहाय्यावांचुन गुरुजी तो दुबळा ।
अधिकाऱ्यांना कागदी आढावा दावितसे सगळा ॥

वरिष्ठांची मर्जि राखावी ।
कशि तरि नोकरि टिकवावी ।
पगाराला गांठ घालावी ।

पवित्र शिक्षण क्षेत्रिं अशि कां गुरुजींची दैना ।
कसा फुटावा गुरुजींना मग शिकवाया पान्हा ।

शाळेचं पवित्र कार्य
गुरुजींना करा हो सहाय्य ।
करा त्यांची दरेक सोय ।

पालकजन तुम्हि मुलं पोंचवा स्वतःहा नेऊन ।
वर्ग गुरुंच्या करा हवालीं नीट बजावून ॥

चुकारपण मग मुलें न करतील रमतील शाळेंत ।
मन लावुनी गुरुजी पण मग अभ्यासहि घेत ॥

मुलं रमतील गुरुजी भौंती ।
अभ्यास जागुनी करती ।
भरभरा चालली प्रगती ।

४ थी ७ वीच्या झाल्या परीक्षा निकालही आला ।
१०० टक्के रिझल्ट लागला झाला बोलबाला ॥

येवढं कशामुळं सुयश लाभलं सांगा कारण ।
चालक पालक मंडळी देती शाळेकडं ध्यानं ॥

चालक पालक मुलं मुली आणि गुरुजी जरि एक ।
त्या शाळेचा आदर्श म्हणुनी जगभर लौकीक ॥

त्या शाळेचा गाईल पोवाडा नानिवडेकर ।
ग्रामराज्याचा ऐका पोवाडा सरा सरा म्होरं ।। धृ० ।।

चौक ४ था.

आदर्श गांवचा कसा चालतो ऐका कारभार ।
पंच मारीती फेरी सकाळीं समद्या गांवभर ।।

लहान मोठे मुजरे करिती करिती नमस्कार ।
अडी अडचणी समजून देती सारे गांवकर ।।

रस्त्यावर अन् गल्ली बोळांत नाहीं कुठें केर ।
खतामुतांचे ओघळ नाहीं कुठेंहि दिसणार ।।

केरन् कचरा गोळा करूनी गाडिती खड्डयांत ।
कंपोस्टाचे खत दुहेरी फायदा काढतात ।।

घरोघर भिंतीं आणि आंगण सारविती चोख ।
गालीचापरि दारापुढती रांगोळी लख्ख ।।

कोने कोंपरे मोडून गांवचे रस्ते करा रुंद ।
पिढ्या पिढ्याच्या जुन्या वहिवाटी करा आतां बंद ।।

नव्या युगाचा माणुसकीचा वारा सुटे मंद ।
एकजुटीनें प्रेमें नांदा भोगा आनंद ।।

थोडं हिकडं काय, थोडं तिकडे काय, जाऊं द्या रस्त्यांत ।
आपुल्याच गांवच्या फायद्यासाठीं सोडा आतां स्वार्थ ।।

तुमचं खेडेगांव टुमदार बनवा तुमच्याच हातानं ।
रस्त्याकडची गटार बांधा घडवि दगडानं ।।

अशि गांवची साफसफाई ।
कुठं केर न् कचरा न्हाई ।

सांडपाणी झिरपून जाई ।
चिलटांचा त्रास मग न्हाई ।
डासांचा त्रास मग नाहीं ।
रोगाला थाराच नाहीं ।
मग आरोग्य सांगू काई ।

नाहींतर देवी गोवर कांजिण्या पटकी महामारी ।
खरूज नारू करट नायटे कायमची फेरी ॥

ह्या रोगांतुन तुमचे गांवकरि कसे वांचवाल ।
औषध नाहीं डॉक्टर नाहीं रोग्याचे हाल ॥

देवाला नवसचि करतां ।
अंगारे धुपारे करतां ।
भुत खेत पिशाचहि बघतां ।
देवऋषाच्या पायां पडतां ।

ताइत गंडे बांधुनि कां रं रोगि जगविणार ? ।
उठा झडकरी शहरीं जाऊन आणवा डॉक्टर ॥

डॉक्टर येतील भरकन् घेऊनि अपुली मोटार ।
जोडरस्त्याविण त्यांची मोटर खड्डयांत आडणार ॥

जोडरस्ता अजुन कां रं न्हाई ? ।
किति दंग संसारापायी ? ।
कशि कळ कुणालाच न्हाई ।

प्रपंचातुन वेळ काढुनी गांवचं हीत साधा ।
आडव्या रस्त्यानं मोठ्या रस्त्याला आपलं गांव सांधा ॥

बाळंतीणीची जनावरांची कुचंबणा फार ।
वेळेवर नाहीं डॉक्टर म्हणुनी पटपट मरणार ॥

आतां उठा उठा भरभर ।
घ्या कुदळ घमेलं खोरं ।
सारि जमा लहान थोर ।

उद्यां सकाळीं जोड रस्त्याचं सुरूं करूं काम ।
श्रमदानानं आपुल्या गांवासाठीं गाळूं या घाम ।।

ओढ्यापासुन सणगर वाडा रस्ता बनविला ।
किसरुळ गांवच्या महादेव शाहीर हरकुनिया गेला ।।

चौक ५ वा.

नदीचं पाणी आपुल्या गांवाला लाभलंय नशिबानं ।
पानोठ्याला चिखल निसरडं कायमची घाण ।।

पायऱ्या करूं या घाट बांधुया करतोय बडबड ।
बैठक झाली किं ज्यो त्यो धांवला आपुल्या घराकडं ।।

पावसाळा गेला हिंवाळा गेला उन्हाळाही गेला ।
दिवस गेला महिना गेला जल्मसुधी गेला ।।

नदीवरच्या पानोठ्याला ।
कधीं पायऱ्या करूं या बोला ।
श्रमदान कष्ट करण्याला ।
कधिं जमूं या लौकर बोला ।

टेंकावरचे दगड लोटुनी बांधूया घाट ।
बायकांपोरांना बाराहि महिने सुंदर मग वाट ।।

विहिरीला पैसा जमवा
सरकारी सहाय्यही मिळवा ।
ओढयावरती विहिर ती चढवा ।

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ
अनुक्रम
दि:
नोंद दि:

दूषित पाणी पिऊं नका कुणि आतां स्वराज्यांत ।
सहाय्य कराया अपुलं सरकार सज्ज तुम्हां पुढतं ।।

करा दूर सारि गाऱ्हाणीं ।
हरिजनांसि द्याहो पाणी ।
द्या नविन विहिर काढोनी ।

राहाण्यासाठीं सुंदर छोटीं बांधुनी द्या घरं ।
हरिजन वस्ती तुमच्या गांवची करा नमुनेदार ।।

हेवेदावे पार्ट्या दुफळ्या कधीं संपणार ।
न्याय नीतीनं राज्य हांकारा करतो नमस्कार ॥

## चौक ६ वा.

आपल्या गांवांत उजेड दावा । चौका चौकांत कंदील लावा ॥धृ०।।

अंधारातला नको कारभार ।
उजेडांत करा व्यवहार ।
रात्रीं जमूनि चावडीच्या म्होरं ।
गांव हिताच्या बैठकी भरवा । आपल्या गांवांत उजेड दावा ॥

उजेडानंच फायदा होणार ।
ठेंचा रस्त्यांत नाहीं लागणार ।
पाय घाणींत नाहीं पडणार ।
लांब शौचाला जातील पोरं ।
बायाबापड्यांची सोय कांहीं करवा ।
नविन संडास गोपूरी आणवा ॥ धृपद ॥

पंचायतीला सत्ता आली वसुल बि जमला चावडीवर ।
आतां कशाची कुरकुर सांगा ठेवुं नका कुठं अंधार ॥

शौचाला कुठें हो जावें ?।
तें ठिकाण तरि दावावे ।
शेताचे बांध तुडवावे ।
पायांत कांटे मोडावे ।
चिखलाचे बूट चढवावे ।
चारी बाजुनीं (शेतामधुनी) मंडळी फिरती हिकडुनिया तिकडे ।
शौचापायीं बायाबापड्यांचे निघती धिंडवडे ॥
तुम्हि गांवचे पुढारी थोर ।
करा शांत मनीं सुविचार ।
ही अडचण करा हो दूर ।
बायकांसाठीं झडकरी बांधा गोपुरि संडास ।
दुहेरि फायदा होईल वांचल बायकांचा त्रास ॥
गांवांत आखाडा पैलवान जाडा लढणार तगडा असावा ।
खाऊन बुडविणार मैदानांत पडणार । बायकांकडं बघणारा नसावा
गांवाची राखण करूनी जागरण फेऱ्या मारणारा असावा ।
दरवडा येतां दगड पडतां घरांत बसणारा नसावा ॥
कुस्ती खेळणारा असावा ।
पण गांवाला पीडणारा नसावा ।
गांवाचा लाडका मैदानांत पडका पैलवान रोडका नसावा ॥

## चौक ७ वा.

सर्वांगांनी शेती सुधारा ऐकुनि घ्या खूणा ।
पहिल्या प्रतिचा बीं बियाणा हुडकुनिया आणा ॥
जनावरांची उत्तम व्हावी निपज पैदास ।
खोंड खिल्लारी वळू पाळुंया आपुल्या गांवास ॥

अनुक्रम २३५८३ वि: ७८५४१ क्रमांक ७०७४ नों: दि: २३.१.८

निकस जमिनी सकस बनवा बांधुनिया ताली ।
धूप थांबली पिकें काढिली बघारे भौंताली ॥

कोंबडी पालन उत्तम धंदा करारे अभ्यास ।
अंडी विकूनी पैका मिळवा तुम्ही भसाभस ॥

शाहिर थकला घसाहि सुकला आरडुन वोरडून ।
विकास योजना दारांत आल्या घ्यारे राबवून॥

चांगले विचार चांगले आचार चांगल्या योजना ।
गांवचे कल्याण खचति करतील ध्यानामधीं आणा ॥

स्वातंत्र्यामधिं विकास साधा आली नामि संधी ।
जुगार आंकडे व्यसने सोडा करा नशाबंदी ॥

दारूबंदीचा कायदा सुखकर सुराज्याची नांदी ।
महादेव शाहिर खेर गिलरां आदरानें वंदी ॥

दुफळ्या मोडा आळस झाडा लागा कार्याला ।
ग्रामराज्याचा गाडा भरधांव जाऊं दे आघाडीला ॥

गांव सुधारलं गांव सुधारलं होईल बोलबाला ।
अशा गांवच्या पोवड्याची हौस शाहीराला ॥

लोकशाहीचा फिरता शाहीर दारावर आला ।
नानिवडेकर हात जोडतो ऐका पोवाड्याला ॥

## चौक ८ वा.

स्वातंत्र्यामधिं राष्ट्रभाट हा खरा हक्कदार ।
लोकशाहीची कीर्त गावया फिरे दारोदार ॥
नव्हता फोनो नव्हता रेडिओ सिनेमाही नव्हता ।
तेव्हांपासून कलगि तुऱ्याचा डफ गांवी होता ॥

तुणतुणं चढवुन खड्या सुरावर गाईल शाहीर ।
देशभक्तिनं भारुन टाकिल दरेक घरदार ॥

मागासांना विकास कळविल समजुत घालून ।
पांचवर्षामधिं उजळुन जाहील देश विकासानं ॥

तीन तपांची सेवा दिधाली विकास कार्याला ।
महादेव शाहीर नानिवडेकर माहित सकलांला ॥

पंचविस गांवीं फिरून मी आलों मोहोळ तालुक्याला ।
स्वानुभवानं पोवाडा बांधला मान्य असो सकलां ॥

गांवकऱ्यांना हात जोडतों करतों नमस्कार ।
लोकशाहीचा महादेव शाहीर नानिवडेकर ॥

REFBK-0010039
REFBK-0010039

समाप्त

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १००३९
नाका